रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १२४
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## वर्ल्ड बॉक्सिंग कपमध्ये भारताला चार 'सुवर्ण'



**नवी दिल्ली :** वर्ल्ड बॉक्सिंग कपमध्ये भारताने आपले नाणे खणखणीत वाजवले आहे. भारतीय खेळाडूंनी सुवर्णपदकांची हॅटट्रिक झाली आहे. मीनाक्षी हुडाने महिलांच्या ४८ किलो गटात सुवर्णपदक जिंकून भारताचे खाते उघडले. त्यानंतर प्रीती पवारने देखील ५४ किलो गट जिंकला आणि अरुंधती चौधरीने ७० किलो गट जिंकून गोल्ड मेडल जिंकले. मीनाक्षी हुडाने गुरुवारी वर्ल्ड बॉक्सिंग कप फायनलमध्ये पहिल्या सुवर्णपदकावर नाव कोरले. त्यानंतर नुपूर शेओरनने महिलांच्या ८०+ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत उझबेकिस्तानच्या ओल्टिनॉय सोटिम्बोएवाला पराभूत करत भारताच्या खात्यात चौथे सुवर्णपदक टाकले.

### अंतरंग

पनवेल मनपा निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध/२
हरवलेले मोबाईल शोधण्यात रायगड पोलीस अव्वल/७
बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये रोणाल पाटीलचे सुयश/८

# भाजप महायुतीच्या प्रचाराला जोर



**खोपोली :** नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ११मध्ये भाजप, शिवसेना व रिपाई महायुतीची संयुक्तरित्या प्रचार रॅली काढण्यात आली. उमेदवार विक्रम साबळे व सानिया शेख यांच्याबरोबर रायगड निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस प्रकाश बिनेदार, प्रभारी सुनील घरत, खोपोली निवडणूक प्रमुख यशवंत साबळे, शहराध्यक्ष अजय इंगुलकर, शिवसेनेचे मोहसिन शेख यांच्यासह युतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांतीनगर येथील दत्त मंदिरात विक्रम साबळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले, त्यानंतर प्रचारास प्रारंभ झाला. गुरुवारी सायंकाळपर्यंत शांतीनगर विभाग पूर्ण करण्यात आला. (छाया : जयवंत माडपे)



**उरण :** नगर परिषद निवडणूकीसाठी उरण शहरात भाजप महायुतीच्या प्रचार रॅलीला सुरुवात झाली असून बुधवारी प्रभाग क्र.१०चे अधिकृत उमेदवार राजेश ठाकूर व दमयंती म्हात्रे, सायली म्हात्रे तसेच नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवार शोभा कोळी–शाह यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी कामठा येथे प्रचार रॅली काढली होती. या वेळी भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, निता महेश बालदी, भाजप उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, सरचिटणीस सुनील पाटील, शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, रवी कुलकर्णी, मनोहर सहतिया, जितेंद्र घरत, राजेश गावडे, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, कैलास भोईर, स्नेहल कासारे, प्रेम मढवी आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते. (छाया : दिनेश पवार)

## रायगडातील १० नगर परिषदांच्या निवडणुकीचे चित्र आज होणार स्पष्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

नगरपालिका निवडणूक प्रक्रियेत शुक्रवारी (दि.२१) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम तारख आहे. उमेदवारी अर्ज मागे गेताल्यावर रायगड जिल्ह्यातल १० नगर परिषदांच्या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

नगरपालिकेसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडत असून, १० ते १७ नोव्हेंबरदरम्यान इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. रायगड जिल्ह्यातील १० नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी ९६३ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १८२ उमेदवारांचे अर्ज छाननीत अवैध ठरले आहेत. नगराध्यक्षपदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी १७ तर नगरसेवकपदासाठी प्रप्त झालेल्या उमेदवारी आर्जांपैकी १६५ अर्ज अवैध ठरले. ७८१ अर्ज वैध ठरले आहेत.

रायगड जिल्ह्यातील सर्व दहा नगरपालिकांमध्ये निवडणुकीचा माहोल आता तापायला सुरूवात झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी प्रभागनिहाय इच्छुकांची झालेली भाऊगर्दी अद्याप ओसरलेली नाही. अर्जाची छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही अनेक ठिकाणी उमेदवारांची संख्या तितकीच आहे. २१ नोव्हेबर ही उमेदवारी आर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर निवडणूकीचे खरे चित्र स्पष्ट होईल.

## जिल्ह्यात सहा उमेदवार बिनविरोध विजयी



**अलिबाग : प्रतिनिधी**

नगर पालिका निवडणूकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी शुक्रवार शेवटचा दिवसला तरी रायगड जिल्ह्यातील गुरुवारपर्यंत (दि.२०) पेण, अलिबाग आणि रोहा या तीन नगरपालिकांमध्ये एकूण सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

पेणमध्ये सर्वाधीक चार उमेदवार बिनविरोध झाले आहेत त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन तर भाजपच्या एका उमेदवाराचा समावेश आहे. पेणच्या रामवाडी येथील प्रभाग क्रमांक ९ अ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वसुधा पाटील यांच्या विरोधात उमेदवारी अर्जच आला नव्हता. त्यामुळे त्या बिनविरोध निवडून आल्या आहेत. पेणमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली असून त्यांनी एकमेकांविरोधात उभ्या केलेल्या उमेदवारांचे अर्ज मागे घेतले आहेत.

प्रभाग क्रमांक ५ ब मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे दिपक गुरव तर प्रभाग क्रमांक १२ अ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुशिला ठाकूर या बिनविरोध विजयी झाल्या आहेत. प्रभाग क्रमांक १२ ब मधून भाजपचे अभिराज कडू बिनविरोध विजयी झाले आहेत. **(पान २ वर..)**

### ताम्हिणी घाटात भीषण दुर्घटना

# थार गाडी ५०० फूट दरीत कोसळून सहा पर्यटक ठार

### ड्रोनच्या मदतीने दोन दिवसांनी घटना उघडकीस

**माणगाव : प्रतिनिधी**



कोकणातील पर्यटन आणि निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी पुणे उत्तम नगर येथून १७ नोव्हेंबर रोजी रात्रीचे सुमारास कोकणात महिंद्रा कंपनीची थार कारगाडीतून कोकणात निघालेल्या तरुण पर्यटकांची गाडीला ताम्हिणी घाटातील कोंडेथर गावाजवळील अतिअवघड वळणावर ५०० फूट खोल दरीत थार (एमएच १२ वायऐन ८००४) ही कार कोसळून झालेल्या भीषण अपघाताने रायगड जिल्हा आणि पुणे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या अपघातात प्रथम शहाजी चव्हाण (वय २२, रा. दत्त मंदीराचे जवळ, भैरवनाथ नगर, कोंढवे धावडे पुणे), पुनित सुधाकर शेट्टी (वय २०, रा. पाण्याचे टाकीजवळ, कोपरेगाव, उत्तमनगर पुणे), साहिल साधू बोटे (वय २४, रा. कोपरेगाव, उत्तमनगर पुणे), महादेव कोळी (वय १८, रा. कोपरेगाव शाळेमागे, भैरवनाथ नगर, पुणे), ओंकार सुनिल कोळी (वय १८, रा. कोपरेगाव शाळेमागे, भैरवनाथ नगर, पुणे), शिवा अरुण माने (वय १९, रा. पुणे) हे सहा तरुण पर्यटकांचा मृत्यू झाला असून या सहाही पर्यटकांचे मृतदेह बाहेर काढून माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

पुण्यातील १८ ते २४ वयोगटातील सहा तरुण १७ नोव्हेंबरच्या मध्यरात्री पुण्याहून पर्यटनासाठी कोकणात येत होते. ताम्हिणी घाटातील कोंडेथर येथे उताराचा धोकादायक भाग असून या वळणावर लोखंडी संरक्षण कठडा बसवण्यात आला आहे. हा संरक्षित कठडा तोडून कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

मोबाईल कॉल न लागल्याने संशय तीव्र तरुणांचे नातेवाईक व मित्रांनी वारंवार फोन करण्याचा प्रयत्न केला, तसेच सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला, परंतु या तरुणांकडून कोणताही प्रतिसाद न आल्याने चिंतेचे सावट पसरले. अखेर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील वारजे उत्तमनगर पोलीस ठाण्यात हे सहा जण हरवले असल्याची तक्रार पुणे शहर उत्तमनगर पोलीस ठाणे येथे १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदविण्यात आली. **(पान २ वर..)**

**मृतांमध्ये सर्व तरुण**

माणगाव तालुक्यातील नागरिक आणि पुणे इथून आलेले मृत तरुणांचे नातेवाईक मोठ्या संख्येने घटनास्थळी पोहोचले होते. या पर्यटक तरुणांचे वय १८ ते २४ दरम्यान असून आयुष्याची सुरुवातही नीट पाहू न शकलेल्या या सर्वांच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली आहे.

### निवडक

**नितीशकुमार यांनी पुन्हा घेतली बिहारच्या सीएमपदाची शपथ**

**पाटणा :** बिहारमधे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नव्या सरकारचा शपथविधी समारंभ गुरुवारी झाला. यात संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीश कुमार यांनी दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी, विजयकुमार सिन्हा, मंगल पांडे, नितीन नबीन, रामकृपाल यादव, श्रेयसी सिंह यांच्यासह २७ मंत्र्यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेतली.

**मुंबईकर गारठले! थंडीमुळे पारा आला १६.२ अंशावर**

**मुंबई :** मुंबईत नेहमी डिसेंबरमध्ये थंडी जाणवते, पण यंदा नोव्हेंबरमध्येच गारठा पडला आहे. सांताक्रूझ वेधशाळेत गुरुवारी सकाळी १६.२ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदवले गेले आहे. या तापमानाने मागील अकरा वर्षांचे रेकॉर्ड तोडले आहे. याआधी राज्यात २०१६ मध्ये १६.४ किमान तापमानाची नोंद झाली होती. यंदा तब्बल पाच अंशांनी घसरल्याने शहरात थंडीचे प्रमाण वाढले आहे.

## नेपाळमध्ये 'जेन-झी'चे पुन्हा आंदोलन; कर्फ्यू लागू

**काठमांडू : वृत्तसंस्था**



नेपाळमध्ये काही दिवसापूर्वी जेन–झीने मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनाला थांबवण्यासाठी केपी शर्मा ओली सरकारने गोळीबार केला होता. यानंतर या आंदोलनामध्ये हिंसाचार झाला होता. दरम्यान, आता नेपाळमध्ये पुन्हा एकदा जेन–झी रस्त्यावर उतरली आहे.

माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांच्या पक्षाच्या, सीपीएन–यूएमएलच्या कार्यकर्त्यांसह जेन–झी मध्ये झालेल्या हिंसक संघर्षानंतर बुधवारी भारताच्या सीमेवर असलेल्या नेपाळच्या बारा जिल्ह्यातील काही भागात कर्फ्यू लागू करण्यात आला. सिमरा विमानतळाच्या ५०० मीटरच्या परिघात दुपारी १२.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत कर्फ्यू लागू राहील, असे बारा जिल्हा प्रशासनाने सांगितले.

कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ किंवा सीपीएन–यूएमएलच्या विरोधात घोषणाबाजी करत शेकडो जेन–झी युवक तेथे जमले होते. मिळालेल्या माहितीनुसार, सीपीएन–यूएमएलचे सरचिटणीस शंकर पोखरेल आणि पक्षाचे युवा नेते महेश बसनेट यांना घेऊन जाणारे बुद्ध एअरचे विमान काठमांडूहून सिमराला जात असताना हाणामारी सुरू झाली. दोन्ही नेते तिथे सरकारविरोधी रॅलीला संबोधित करणार होते. सिमरामध्ये त्यांच्या आगमनाची बातमी पसरताच, 'जेन–झी' निदर्शक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी निषेध करण्यास सुरुवात केली. निषेधादरम्यान उपस्थित असलेल्या स्थानिक सीपीएन–यूएमएल कार्यकर्त्यांशी त्यांची झटापट झाली.

## पेणमध्ये दुचाकीचा अपघात; दोघे ठार

**पेण :** पेण–खोपोली रोडवर गणपतीवाडी जवळ सौभाग्य इन हॉटेल समोरील नात्यावर झालेल्या मोटरसायकलच्या भीषण अपघातात पेणमध्ये दोन तरुणांचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पेणमधील निलेश किरण पाटील (वय २३, रा. पेण) हा त्याचा मित्र वरद अमित सुतार (वय १९, रा. पेण) बीएमडब्ल्यू मोटरसायकलवरून पेण बाजूकडून खोपोली रोडकडे भरधाव जात असताना गणपती वाडी जवळील रस्त्यावर निलेशचे मोटरसायकलवरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्ताच्या डाव्या बाजूस खाली जाऊन त्यांना झाडाची ठोकर लागली.

या अपघातात निलेश याच्या डोक्यास मार लागला व वरद सुतार डोक्याला व मानेला गंभीर दुखापत झाली. उपचारावेळी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये खाद्य महोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये २० नोव्हेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची भेट आणि 'न्यूट्रिनोव्हा' हा खाद्य महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या महोत्सवाचे उद्घाटन आणि फीत कापण्याचा समारंभ रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि दक्षिण आफ्रिकेवरून आलेले परदेशी पाहुणे प्रो. रोनिका मुडली व प्रो. विमोलन मुडली यांच्या हस्ते पार पडले. या वेळी ठाकूर साहेबांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला, त्यांच्या स्टॉल्सना भेटी दिल्या आणि विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. परदेशी पाहुण्यांनी रामशेठ ठाकूर सरांना सन्मानचिन्ह व प्रेमाचे प्रतीक देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

या आंतरराष्ट्रीय भेटीदरम्यान परदेशी तज्ज्ञांनी शाळेतील इयत्ता ९वी आणि १०वी च्या विद्यार्थ्यांशी विशेष संवाद साधला. त्यांनी 'गणितातील संकल्पनांचे दृश्यीकरण' (Visualisation of Mathematical Concepts) कसे करावे, यावर दिलेल्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. तसेच, शिक्षकांसोबत 'Indigenous Knowledge System' (IKS) वर झालेली चर्चा अत्यंत ज्ञानवर्धक आणि फलदायी ठरली.

या कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी **(पान २ वर..)**

## भात कापणी, झोडणीची कामे यंदा उशिराने

**उरण : प्रतिनिधी**



उरण तालुक्यात भात कापणी व झोडणी सुगीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत, मात्र सर्वत्र शेत मजुरांची टंचाई भासत असल्याने शेतकरी वर्ग त्रासला आहे.


निसर्ग चक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणारा पाऊस ही भीती शेतकऱ्यांच्या मनात आहेच. अशातच आता तोंडाशी आलेला घास हिरावून जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांची भात कापणी झोडणीची धावपळ सुरू आहे, परंतु भात कापणीसाठी वेळेत मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी हवालदील झाले आहेत. नाईलाजाने शेतकरी कुटुंबातील नातेवाईकांच्या मदतीने भात कापणीची कामे करताना दिसत आहेत. विशेषतः या भागात आदिवासी स्त्री पुरुष मजुरांची मोठी संख्या आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांना हा हंगामी रोजगार मिळाला आहे.

एकेकाळी भात कापणी झाल्यानंतर भात पिकांची कडवे चार दिवस चांगली वाळल्यानंतरच त्याचे भारे बांधून ते उडव्यात रचून ठेवले जात असत. त्यानंतर शेतातच खळा तयार करून, त्याचे व्यवस्थित शेणाने सारवण करून, त्यानंतर त्या खळ्यावर भात पिकाच्या मळणीची प्रक्रिया केली जात होती. परंतु सध्याच्या लहरी पावसाच्या भीतीने वर्षभर केलेले कष्ट आणि त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जाऊ नये म्हणून शेतकरी पिके न वाळविताच तसेच त्याची साठवणूक न करताच शेतकरी ताबडतोब कापलेले भातपीक झोडून भात घरी आणत आहेत.

भातशेती ही पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओल्या दुष्काळाला, तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमिनी लागवडीखाली न आणता त्या ओसाड ठेवल्या जात आहेत. त्यामुळे या भागात शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे.

## खारघरच्या चाफेवाडीजवळ बिबट्याचा वावर; शोध सुरू

**खारघर : रामप्रहर वृत्त**



खारघर टेकडीवरील चाफेवाडी पाड्याजवळ बिबट्या दिसल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे वातावरण पसरले आहे. ग्रामस्थांनी वन विभागाकडे तातडीने ठोस उपाययोजना करून बिबट्याला सुरक्षितरित्या बंदिस्त करण्याची मागणी केली आहे. मंगळवारी (दि.१८)सायंकाळी चाफेवाडी पाड्यालगत ग्रामस्थांना बिबट्या निदर्शनास आला.

या घटनेमुळे फणसवाडी आणि चाफेवाडी पाड्यातील रहिवाशांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. यापूर्वी, सुमारे चार महिन्यांपूर्वी याच परिसरात चाफेवाडीकडून फणसवाडीकडे जाणारा रस्ता ओलांडताना बिबट्या दिसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. त्यावेळी, ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर वन विभागाने परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावून तसेच बिबट्याच्या पायाचे ठसे शोधण्यासाठी मोहीम राबवली होती, मात्र त्यावेळी वन विभागाला काहीही ठोस पुरावा मिळू शकला नव्हता.

याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी गजानन पांढरपट्टे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, खारघर डोंगरावर चार महिन्यांपूर्वी बिबट्या असल्याची माहिती मिळाल्यावर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गस्त घालून शोध घेतला होता, परंतु बिबट्या निदर्शनास आला नव्हता. सध्या पाड्यात वन कर्मचाऱ्यांकडून पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना केली जाईल असे सांगितले.

## 'काश्मीर टाईम्स'च्या कार्यालयावर छापा

### सुरक्षा यंत्रणाकडून मोठी कारवाई, शस्त्रात्रे केली जप्त

**जम्मू : वृत्तसंस्था**

जम्मू–काश्मीरमध्ये दहशतवादी आणि देशविरोधी कारवायांवर सातत्याने प्रहार करणाऱ्या सुरक्षा यंत्रणांनी गुरुवारी एक मोठी कारवाई केली. जम्मू–काश्मीर पोलीस आणि स्टेट इन्व्हेस्टिगेशन एजन्सी (एसआयए)ने येथील इंग्रजी वृत्तपत्र 'काश्मीर टाईम्स'च्या कार्यालयावर छापा टाकला. देशविरोधी कारवायांना प्रोत्साहन देणे, देशाविरुद्ध द्वेष पसरवणे आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण करण्याच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली आहे.

एसआयएने ही छापेमारी न्यायालयाच्या वॉरंटनंतर केली. तपासादरम्यान, अधिकाऱ्यांनी कार्यालयाच्या परिसराची आणि संगणकांची कसून तपासणी केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या झडतीमध्ये सुरक्षा दलांना एके–४७ रायफलच्या काही गोळ्या, पिस्तूलचे राऊंड आणि ग्रेनेडचा एक लिव्हर (हँडल) जप्त करण्यात आला आहे.

# विषमुक्त शेती करणे हेच देशाचे मिशन - राज्यपाल आचार्य देवव्रत

**पुणे : रामप्रहर वृत्त**

विषमुक्त शेती करणे हेच देशाचे मिशन असून नैसर्गिक व सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून प्रेरणा घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तामिळनाडू राज्यातील कोईम्बतूर येथून ऑनलाइन पद्धतीने वितरण झाले. या कार्यक्रमास कृषी महाविद्यालय पुणे येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्यपाल आचार्य देवव्रत उपस्थित होते. यावेळी कृषी विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. कार्यक्रमाला कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, राज्यपाल यांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, राज्यपाल यांचे उप सचिव राममूर्ती आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. देवव्रत म्हणाले, राज्यात काही शेतकरी नैसर्गिक व सेंद्रिय शेती करुन स्वत:च नवनवीन शोध लावत आहेत. एकप्रकारे ते शास्त्रज्ञाचे काम करीत आहेत. त्यांचा शोध इतरांना मार्गदर्शक आहे. अति प्रमाणात रसायने फवारल्याने रोपांचे नुकसान होते. नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले द्रव्य अग्नीअस्त्र व निमास्त्राचा आलटून- पालटून फवारणी केल्यास शेतामध्ये कधीही निमॅटोडची समस्या राहणार नाही.

राज्यपाल देवव्रत यांनी शेतीविषयी आपले अनुभव कथन करून पिकांचे संरक्षण आणि उत्पादन वाढविण्यासाठी नैसर्गिक शेती पद्धतीविषयी माहिती दिली.यावेळी आयुक्त श्री.मांढरे यांनी 'पी एम किसान सन्मान निधी' योजनेसंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले राज्यातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात २१ व्या हप्त्यापोटी १ हजार ८०८ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. योजनेच्या निकषानुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास रुपये २ हजार प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यात दरवर्षी एकूण ६ हजार रुपये जमा करण्यात येतात. आत्तापर्यंत ३६ हजार कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यपाल देवव्रत यांच्या हस्ते जिल्ह्यातील नैसर्गिक शेती करणाऱ्या मंगेश भास्कर, दत्तात्रय निगडे, रामदास लांडगे, अनिल पायगुडे व लहू फाले या शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीतील अनुभव सांगितले.

# आता लक्ष माघार घेणाऱ्यांकडे; आज लढती होणार स्पष्ट

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक दहा प्रभागात एकूण वीस जागेसाठी होत आहे.यामध्ये दहा महिला आणि दहा पुरुष जागेसाठी निवडणूक होणार आहे.प्रदीर्घ कालावधीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थां च्या निवडणुका होत असल्याने इच्छुकांची यादी सर्वच पक्षात मोठी होती.यातच अनेकांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले असून आता माघार घेणाऱ्यांकडे लक्ष लागले आहे. आज दुपारी तीन वाजेपर्यंत याबाबत चित्र स्पष्ट होणार असून मुख्य लढती कोणासोबत होणार याकडे लक्ष लागले आहे.

माथेरान नगरपालिका निवडणूक रणधुमाळी सुरू झाली आहे.दोन दिवसांपूर्वीच उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण झाली.आता लक्ष लागले आहे ते अपक्ष उमेदवार उभे असलेल्या प्रभागांनकडे येथील काही प्रभागात अनेकांनी नाराज कार्यकर्त्यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत.यामध्ये बंडोबांना थंड करण्याचे आवाहन आता समोर आहे.आज दुपारी तीन वाजे पर्यंत हे चित्र स्पष्ट होणार असून यानंतरच खऱ्या लढती कोणासोबत होणार हे समोर येईल.प्रभाग क्रमांक चार ,प्रभाग क्रमांक सात आणि प्रभाग क्रमांक आठ याठिकाणी नाराज उमेदवारांनी आपले अपक्ष अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे या प्रभागात अजूनही लढती स्पष्ट झाल्या नाहीत.या अपक्ष उमेदवारांनमुळे पक्षाच्या उमेदवाराला धोका निर्माण होऊ शकतो.त्यामुळे कोणते अपक्ष उमेदवार माघार घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या निवडणुकीत सहा नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी अर्ज घेतले मागे

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषदच्या निवडणुकीत रंगत वाढले असून गुरुवारी रोहा नगरपरिषदेच्या नगरसेवक पदाचे ६ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहे. त्यामुळे नगरसेवकपदासाठी ६२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून थेट नगराध्यक्ष पदाचे ३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम आहेत.रोहा अष्टमी नगर परिषदेच्या निवडणुकीत बुधवारी राष्ट्रवादीचे ( अजित पवार गट ) राजेंद्र जैन हे प्रभाग क्रमांक २ ब मधून बिनविरोध आल्याने राष्ट्रवादीला शुभ शकुन मानला जातो.

दुसरीकडे आता उर्वरित १९ सदस्य पदासाठी ६२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.अर्ज मागे घेण्याच्या पहिल्याच दिवशी ३ उमेदवारांनी सदस्य पदाचे अर्ज मागे घेतल्याने ६८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम राहिले आहेत. तर थेट नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार निवडणुकीसाठी अद्याप कायम आहेत.तर आता ६२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत माझी वसुंधरा ६.० मध्ये राज्यात पहिली

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सर्वाधिक लोकसंख्या असणारी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीची ओळख आहे.सध्या जवळपास ६५ हजार लोकसंख्या आहे.पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढवण्यास त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी माझी वसुंधरा ६.० अभियान सर्वत्र राबविले जात आहे.या अभियाना अंतर्गत ई-शपथमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचा सहभाग होता.यात कोकणातील ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांनी माझी वसुंधरा ६.० मध्ये ८६०१ ई-शपथ घेवून राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला.ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांचा माझी वसुंधरा ६.० अंतर्गत ई-शपथमध्ये प्रथम क्रमांक आल्याने सरपंच उमाताई संदिप मुंढे,उपसरपंच दिपक कांबळे,ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील,ग्रामपंचायत सदस्य संदिप मुंढे,सदस्या रसिका खराडे,सदस्या प्रतिक्षा राऊत,सदस्या मयुरा गोपाळे,प्रशाली खाने,वेदीका पाटील,माया पाटील,कविता मांडे,संगिता भोईर काकी,स्वप्नाली मैदर्गीकर,वनिता पारंगे ,ताई पवार,सदस्य आकाश जुईंकर,राकेश खारकर,केदार भोईर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचा-यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# देशभर १५१ कोटी वृक्ष व मोफत वृद्धाश्रमाचा संकल्प

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठा विनामूल्य वृध्दाश्रम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजकोट येथील 'सदभावना वृध्दाश्रम' तर्फे दोन भव्य उपक्रमांची घोषणा करण्यात आली आहे.

देशभर १५१ कोटी झाडे लावण्याचा आणि त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प तसेच जगातील सर्वात मोठा ११ मजली मोफत वृध्दाश्रम कॉम्प्लेक्स उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय संस्थेने जाहीर केला.




मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत संस्थेचे संस्थापक आणि 'ग्रीन मॅन' म्हणून ओळखले जाणारे विजय दोबारिया, संस्थेचे सल्लागार मितल खेतानी, तसेच हसु भाई नागरेचा, उर्मीबेन राडिया, धिरेन्द्र कनाबार, गोविंद भानुशाली आणि जयेश जरीवाला उपस्थित होते.


विजय दोबारिया म्हणाले, गेल्या दहा वर्षांत आम्ही १.१० कोटी झाडे लावून त्यांचे संवर्धन केले आहे. आता भारतभर १५१ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला असून त्यातील पहिली तीन कोटी झाडे महाराष्ट्रात लावण्यात येणार आहेत. गुजरातमध्ये १५० मियावाकी जंगलं तयार करण्याचाही आमचा मानस आहे.

या सामाजिक कार्याला आध्यात्मिक बळ देण्यासाठी पूज्य संत मोरारी बापूंची 'मनस वंदे मातरम्' रामकथा घाटकोपर येथील आचार्य अत्रे मैदानात २२ ते ३० नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली असल्याची माहितीही विजयभाई दोबारिया यांनी दिली.

# पनवेल मनपा निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

**पनवेल : वार्ताहर**

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळा- पत्रकानुसार पनवेल महापालिकेने प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या तयार केल्या आहेत. अखेर आज या प्रारूप याद्या महापालिकेच्या प्रभाग कार्यालयांमध्ये सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात आल्या.महापालिका प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार प्रभाग रचना तयार केली. त्यानंतर निवडणुकीसाठी आरक्षण सोडत काढली. या सोडतीसोबतच महापालिका निवडणूक विभागाने प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे कामही सुरू केले होते. २० नोव्हेंबर रोजी यादी प्रसिद्ध करण्याबाबत सुधारित वेळापत्रक काढले. आयोगाच्या तारीख पे तारीखकडे इच्छुकांचे लक्ष लागले होते. आयोगाने हेच वेळापत्रक कायम ठेवले आहे. प्रभागनिहाय तयार केलेल्या प्रारूप मतदार याद्या आज सकाळी ११ वाजता सर्व प्रभागणकार्यालयांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.



विधानसभा निवडणुकीसाठी वापरलेल्या मतदार याद्या महापालिकेसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्यामुळे या याद्यांची विभागणी प्रभागनिहाय करून त्या प्रसिद्ध करण्यात याव्यात, असे आदेश आयोगाने पनवेल महापालिका प्रशासनाला दिले होते. त्यानुसार ही प्रक्रिया सुरू असून, आज याद्या प्रसिद्ध होताच त्यावर सूचना हरकतींसाठी २७ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली जाणार आहे. तर प्राप्त हरकतींवर निर्णय घेऊन ५ डिसेंबरपर्यंत अंतिम याद्या प्रसिद्ध करायच्या आहेत. त्यानंतर ८ डिसेंबरपर्यंत मतदार केंद्र निश्चित करून त्या-त्या मतदार केंद्रनिहाय मतदार याद्या १२ डिसेंबरपर्यंत प्रसिद्ध करायचे आदेश आयोगाने दिले आहेत. पनवेल महानगरपालिकेतील प्रभाग समिती अ अंतर्गत उप विभाग नावडे मध्ये १,२, ३ प्रभाग, प्रभाग समिती अ कार्यालय, खारघर मध्ये ४,५,६ प्रभाग, प्रभाग समिती व कळंबोली मध्ये ७,८,९,१० प्रभाग, प्रभाग समिती क कामोठे मध्ये ११,१२,१३ प्रभाग, तर प्रभाग समिती ड पनवेल मध्ये १४,१५,१६,१७,१८,१९,२० हे प्रभाग असून त्यांची मतदार यादी निरीक्षणासाठी ठेवण्यात येणार आहे.

# माणगाव टिएमसी कॉलेज आयोजित रक्तदान शिबिर

**माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी**

जे.बी .सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव यांच्या वतीने शासकीय रुग्णालय अलिबाग, रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने गुरुवार दि.२० नोव्हेंबर रोजी टिएमसी कॉलेज माणगाव येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.




या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी सहभाग घेऊन स्वेच्छेने उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या शिबिराला महाराष्ट्र राज्याचे माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई,जे.बी .सावंत एज्युकेशन संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत,महाविद्यालयीन विकास कमिटीचे सभासद रामदास पुराणिक,माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.दिपक देशमुख,पहल संस्थेच्या प्रकल्प मॅनेजर मीनाक्षी सबनीस,माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या रक्त संक्रमण तंत्रज्ञ मनीषा नवाले यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन आयोजकांचे भरभरून कौतुक केले. यावेळी शिबिरास भेट दिलेल्या सर्व मान्यवरांचे तसेच सर्व रक्तदात्यांचे कॉलेजच्या प्राचार्या डॉ.अमृता देशमुख,सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवृंद व विद्यार्थी यांनी स्वागत केले.सदर शिबीरास जिल्हा शासकीय रुग्णालय रक्तपेढी अलिबागचे अलिबाग रक्तपेढीचे डॉ.दिपक गोसावी यांनी सदर शिबीर यशस्वी केले

## पान १ वरुन

### जिल्ह्यात सहा उमेदवार बिनविरोध विजयी

रोहा नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसने विजयी सलामी दिली आहे. प्रभाग क्रमांक २ मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र जैन विरूदध शिवसेना ठाकरे गटाचे संजय देऊळकर यांच्यात सरळ लढत अपेक्षित होती. परंतु संजय देऊळकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राजेंद्र जैन हे बिनविरोध विजयी झाले आहेत. अलिबाग नगर पालिका निवडणूकीत प्रभाग २ ब मधील प्रतिस्पर्धी उमेदवार यांनी गुरूवारी (दि. २०) आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आले आहेत.

### थार गाडी ५०० फूट दरीत कोसळून सहा पर्यटक ठार

१९ नोव्हेंबरच्या रात्री माणगाव पोलिसांनी ताम्हिणी घाटात शोधमोहीम सुरू केली. तेव्हा एका अवघड वळणावर लोखंडी संरक्षण कठडा तुटलेला आढळला. ड्रोन उड्डाण केल्यानंतर घनदाट झाडीत थार कारचा एक भाग चमकताना दिसला व अपघात निश्चित झाला. रात्र झाल्याने तपास मोहीम थांबवावी लागली; मात्र २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० पासून पुन्हा मोठ्या प्रमाणात रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले.

रेस्क्यू टीमचा संघर्ष - झाडीतून मृतदेहांपर्यंत पोहोचणे अवघड माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, महामार्ग वाहतूक शाखेचे अधिकारी, माणगाव तहसीलदार व त्यांचे महसूल कर्मचारी, रोहा येथील सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे समर्पण रेस्क्यू टीम, तसेच आपत्ती व्यवस्थापन दल यांनी संयुक्तपणे ३०० फुटांच्या दरीत उतरत जीवघेणा शोध सुरू केला. या मृतदेहाजवळ पोहचण्यासाठी झाडे - झुडपे कापत रस्ता तयार करून, उंच दगडी तीव्र उतार पार करत रेस्क्यू टीम मृतदेहांपर्यंत पोहचली. दुपारी ३.१५ वाजण्याच्या दरम्यान दरीतील झाडा जुडपात विखुरलेल्या अवस्थेत सहाही तरुणांचे मृतदेह मिळाले. ते सर्व मृतदेह बाहेर काढण्याचे काम रेस्क्यू ऑपरेशन चालू होते.

दरीत सर्वत्र घनदाट झाडी असल्याने मानवी दृष्टी पोहोचणे अशक्य होत होते. ड्रोनच्या मदतीने गाडीचे भाग, मृतदेहांची जागा आणि उताराचा अंदाज घेण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण ऑपरेशनला गती मिळाली.

### लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये खाद्य महोत्सव उत्साहात

रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, राहुल घरत सर JBSP संस्था, एल.आर.टी.ई.एम.एस जू. कॉलेज च्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, आर.टी.पी.एस. उलवेचे प्राचार्य किरण कुमार आणि सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर उपस्थित होते. शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या झाला.




# पोलादपूरच्या मोरे महाविद्यालयातील १५ प्राध्यापक झाले पीएचडीधारक

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाडच्या शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. स्नेहल सुशिल कांबळे यांना मुंबई विद्यापीठाने नुकतीच रसायनशास्त्र विषयातील पीएच.डी. ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी बहाल केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ.महेश वल्ले यांनी दिली. यामुळे महाविद्यालयाच्या २०पूर्णवेळ प्राध्यापकांपैकी १५ प्राध्यापक पीएचडीधारक डॉक्टरेटप्राप्त झाले आहेत.



पीएच.डी. पदवीसाठी डॉ. स्नेहल कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रामध्ये संशोधनाचे कार्य केले.

सदर संशोधनासाठी त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांचे मार्गदर्शन लाभले. स्टडीज ऑन स्ट्रक्चरल एँड सिंथेटिक प्रॉपर्टीज ऑफ मिक्स्ड मेटल टार्टस या विषयावर सखोल संशोधन करून डॉ. स्नेहल कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाला आपला संशोधन प्रबंध सादर केला.

पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने डॉ.स्नेहल कांबळे यांचा पुष्पगुच्छ प्रदान करून विशेष सत्कार करण्यात आला.

## दुखवटा

### विद्याताई पाटील



अलिबाग : उद्योजिका विद्याताई पाटील यांचे पुण्यात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अलिबाग येथील स्मशान भूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. १९७७ साली त्यांनी अलिबाग मध्ये बेकरी व्यवसायाला सुरूवात केली होती. दर्जेदार उत्पादने आणि माफक दरामुळे बेकरी कमालीची लोकप्रिय झाली. या बेकरी उद्योगाने नुकतेच ५७ वर्षात पदार्पण केले होते. या माध्यमातून अनेक गरजू महिलांना त्यांनी रोजगार संधी उपलब्ध करून दिली. गेली काही दिवस आजारपणामळे पुण्यात वास्तव्याला होत्या. आज त्यांची प्राणज्योत मालवली. मृत्यू समयी त्या ७८ वर्षांच्या होत्या.

## निवडक

### अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला

**पनवेल :** शहर पोलीस ठाणे हद्दीत एका बेवारस अनोळखी मयत इसम आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष, पत्ता माहिती नाही, वर्णन चेहरा उभट, नाक सरळ व मोठे, केस काळे वाढलेले, दाढी पिकलेली थोडी वाढलेली, डोळे काळे, अंगात नेसुन सफेद रंगाचा शर्ट व चॉकलेटी रंगाची पॅन्ट आहे . याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे मो. ९९२२३६७३४८ ८६५४३४४१११ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बाजारपेठेत देवीचे मुखवटे दाखल

**पनवेल :** मार्गशीर्ष महिना अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे पनवेलच्या भाजी मार्केटमधील बाजारपेठा देवींचे आकर्षक मुखवटे आणि पूजन साहित्यांनी गजबजल्या आहेत. यंदा मार्गशीर्ष महिना शुक्रवार (दि.२१)पासून सुरू होत असून आतापासूनच देवी प्रतिष्ठापनेसाठी महिला वर्गासह पुरूष मंडळी मोठ्या उत्साहात खरेदीस सुरुवात करताना दिसत आहेत. उपवास, नित्यपूजन आणि भक्तीच्या तयारीने मार्केटमध्ये सणासुदीचे वातावरण रंगत आहे.

### विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच वाटप

**पनवेल :** लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सव निमित्ताने अडसुळे दाम्पत्यांकडून गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच वाटप करण्यात येणार आहे. रविवार २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता विपग्यर हायस्कूल य सेक्टर १५, खारघर येथील मैदानावर इयत्ता दहावी आणि बारावीतील प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवर खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या उपस्थितीत स्मार्ट वॉच तसेच प्रशस्तीपत्र देऊन गुणगौरव करण्यात येणार आहे.

### वाहनाची काच फोडून रोकड लंपास

**पनवेल :** कळंबोली उपनगरात व्यापाऱ्याच्या वाहनाची काच फोडून तब्बल चार लाख रुपयांची रोकड लंपास केली आहे. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उलवे येथे राहणारे संबंधित व्यापारी कळंबोली सेक्टर ११ येथील इमारतीमध्ये ट्रेडिंगचा व्यवसाय करतात. सकाळी त्यांनी त्यांचे वाहन कार्यालयासमोर उभे केले होते. दुपारी वाहनाकडे परतल्यावर काच फुटल्याचे त्यांना आढळले. आतमध्ये ठेवलेल्या पिशवीतील चार लाखांची रोकड गायब झाल्याचे लक्षात येताच कळंबोली पोलिसांत धाव घेतली.

### १६ लाखांची फसवणूक

**पनवेल :** व्यवसायाच्या गुंतवणुकीसाठी दिलेले सोळा लाख रुपये परत न करता फसवणूक केल्या प्रकरणी निलेश निफाडे पाटील (राहणार शिरवाडे वणी, निफाड, नाशिक) यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाणे दाखल करण्यात आला. वर्षा या सेक्टर १९ कामोठे येथे राहत असून त्यांची निलेश निफाडे पाटील यांच्यासोबत ओळख झाली. त्याने तो मोठा व्यावसायिक असल्याचे भासवले होते. तो वर्षा यांच्याकडे पैसे मागू लागला. त्यानुसार त्यांनी त्यांना पैसे पाठवले. व्यवसायासाठी त्यांनी निलेश याला पैसे दिले. व्यवसायाच्या गुंतवणुकीसाठी एकूण १६ लाख रुपये घेऊन ते पैसे आज देतो उद्या देतो असे बोलून फसवणूक केली.

# कामोठे येथे रस्ते दुरुस्तीच्या कामांना सुरुवात

## भाजपचा पाठपुरावा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यानंतर कामोठेतील अंतर्गत रस्त्यांची झालेली दुरवस्था लक्षात घेता, नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि दैनंदिन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या रस्तादुरुस्ती आणि डांबरीकरणाच्या कामांना अखेर प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. सेक्टर ३५पासून या कामाचा शुभारंभ होत संपूर्ण कामोठे परिसरात टप्प्याटप्प्याने खड्डे बुजविणे व



डांबरीकरण करण्यात येणार आहे.

पावसाळ्यात निर्माण झालेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे कामोठेकरांना रोजच्या प्रवासात मोठा त्रास सहन करावा लागत होता. अनेक वाहनांना नुकसान होणे, अपघाताची शक्यता वाढणे, तसेच वाहतुकीत अडथळे निर्माण होणे अशा अनेक समस्या नागरिकांनी वारंवार पुढे मांडल्या होत्या. या तक्रारींवर गांभीर्याने लक्ष देत भारतीय जनता पक्ष कामोठे मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्याचा परिणाम म्हणून गुरुवारपासून प्रत्यक्ष रस्तादुरुस्तीची कामे सुरू झाली.

खड्डेमुक्त कामोठे हा आमचा ठाम संकल्प असून ही सर्व कामे जलद गतीने, दर्जेदार पद्धतीने आणि नागरिकांच्या सोयीचा विचार करून पूर्ण केली जातील, असे शहरध्यक्ष विकास घरत यांनी सांगितले. रस्तादुरुस्तीच्या या उपक्रमाच्या सुरुवातीप्रसंगी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, भाजपच्या जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे यांच्यासह पदाधिकारी, ज्येष्ठ समाजसेवक, स्थानिक नागरिक तसेच कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांनी या कामांचे स्वागत करत भाजप मंडळाच्या पुढाकाराचे कौतुक व्यक्त केले.

## अवैधरित्या विक्रीसाठीचा गावठी दारू निर्मितीचा साठा उद्ध्वस्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मितीचा साठा जागीच जाऊन उद्ध्वस्त केला असून या प्रकरणी एकाला तब्यत घेतले आहे

तालुक्यातील भांगरपाडा गाव जवळील प्रस्तावित डी-मार्ट जवळील जंगलात खाडीच्या बाजूला विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मिती केली जात असल्याची खबर वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस शिपाई सूर्यकांत काकडे, पोलीस हवालदार कारंडे, पोलीस शिपाई गाभाले, पोलीस हवालदार



प्रवीण मेथे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन जवळपास हजारो रुपये किमतीची कच्ची दारूचे नवसागर द्रव्य जागीच नष्ट केले तसेच त्या ठिकाणी असलेला पातेले, काचेच्या बाटल्या व इतर वस्तू हस्तगत केल्या आहेत.

## एक कोटी ३५ लाख ३१ हजारांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोन काढलेल्या रकमेपेक्षा अधिकचे रक्कम देण्याचे आश्वासन देऊन सहा जणांची एक कोटी ३५ लाख ३१ हजार ४९० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अमित अशोक शेट्टी (रा. सेक्टर आर टू माय गोपाळ सोसायटी, वडघर) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण कांबळे हे करंजाडे, सेक्टर ५ येथे राहत असून त्यांची ओळख अमित अशोक शेट्टी यांच्याशी झाली. अमित शेट्टी यांनी त्याच्याकडे पैसे मागितले. पैसे दिल्यानंतर ते पैसे लगेच परत केल्याने त्यांचा व्यवहारावर विश्वास बसला. त्यानंतर अमित याने त्याच्याकडील चेक देऊन किरण यांच्या नावावर क्रोमा कामोठे येथून सॅमसंग कंपनीचा मोबाईल व आयफोन या वस्तू फायनान्स करून घेतल्या. त्या बदल्यात पाच लाखांचा चेक दिला. मोबाईलचे तीन हप्ते रेगुलर भरले. त्यानंतर जमिनीचे खोटे पेपर बनवले आणि किरण यांच्या नावावर ऑनलाईन पर्सनल लोन घेऊन पुन्हा नवीन मोबाईल विकत घेतले. त्या बदल्यात पंचवीस लाखांचा चेक दिला.

किरण यांच्या पत्नीकडून तीन तोळ्याचे मंगळसूत्र घेतले आणि त्या बदल्यात पाच तोळ्याचे मंगळसूत्र आणून देतो असे सांगितले, मात्र मंगळसूत्र दिले नाही. असे एकूण ११ लाख ९८ हजार रुपयांचे वस्तू आणि लोन घेतले. अमित शेट्टी यांनी ते चेक वटवण्यास नकार देऊन त्या बदल्यात खरेदी केलेले आणि लोन काढलेल्या रकमेपेक्षा अधिकचे रक्कम देण्याचे आश्वासन दिले. तसेच पनवेल परिसरात प्लॉट खरेदी करून देतो असे आश्वासन देऊन किरण यांच्या नावावर वस्तू आणि पर्सनल लोन काढले. त्याने वस्तूचे आणि पर्सनल लोनचे हप्ते भरले नाही. म्हणून किरण याने अमित याला फोन केला असता त्यांनी उडवा उडविची उत्तरे दिली.

या वेळी मेहराज सावरटकर, विष्णू साळवे, रुपेश राजे, हिरालाल पवार, गणेश गोसावी यांची देखील एक कोटी २३ लाख ३२ हजारांची फसवणूक केल्याचे त्यांना समजले.

## फुंडे विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**उरण : रामप्रहर वृत्त**

शाळेकडून झालेल्या जडणघडणीची जाणीव ठेवून माजी विद्यार्थ्यांकडून शाळेबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी शाळेच्या विकासात महत्वाचा हातभार लावत असतात. या माजी विद्यार्थ्यांच्या सहयोगातून शाळेच्या गुणवत्ता विकासास अधिक चांगल्या प्रकारे चालना मिळू शकते.

त्यासाठी तु. ह. वाजेकर उच्च माद्यमिक विदयालय, फुंडे येथे बुधवार दिनांक १९/११/२०२५ रोजी मा. चेअरमन कृष्णाजी कडू यांच्या अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांनी केले. विद्यालय स्थापने पासून आज पर्यंतच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी सांगितल्या. तसेच विद्यालया मध्ये माजी विद्यार्थी संघ का स्थापन करावा त्याचा उद्देश काय याबद्दल माहिती दिली.

उपस्थितांच्या स्वागता नंतर गोपाल पाटील, दिपक ठाकूर, भार्गव पाटील यांनी आपले अनुभव सांगत, शाळा उत्कर्षा कडे वाटचाल करत असताना आपले सर्वांचे योगदान असणे गरजेचे आहे असे सांगितले. त्या नंतर माजी विद्यार्थी संघाची नवीन कार्यकारिणी स्थापन करण्यात आली.

अध्यक्ष भार्गव पाटील, उपाध्यक्ष दीपक ठाकूर, सचिव प्राचार्य बी.बी.साळुंखे, सल्लागार मच्छिंद्र घरत, कोषाध्यक्ष सुरज ठाकूर, निवृत्त शिक्षक आर. पी.ठाकूर, सदस्य - गोपाल पाटील, कुणाल पाटील व इतर. या सभेस एच.एम.धुरी, उपशिक्षिका एस.जे.माळी व इतर सेवक उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत विद्यालयाचे लेखनिक नवनीत ठाकूर यांनी केले व आभार एस.डी.म्हात्रे यांनी मानले.

## मित्राने चोरली दोन तोळे सोन्याची चेन

**पनवेल :** मित्रानेच दोन तोळ्याची चैन चोरल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निहार मंजू हा पनवेल येथे राहत असून, त्यांच्या वडिलांचा बुल्स ग्रीन्स ट्युलिप येथे फ्लॅट आहे. निहार आणि त्याचे मित्र यांनी इंडियाबुल्स या ठिकाणी फ्लॅटवर जाण्याचे ठरवले. ते त्या ठिकाणी गेले आणि त्या ठिकाणी गप्पा मारत बसले. ते बाहेर फेरफटका मारून आले व बेडरूममध्ये झोपले. ते सकाळी नऊ वाजता झोपेतून उठले असता, त्याच्या गळ्यातील दोन तोळ्याची सोन्याची चेन आणि डोक्यातील ग्रे रंगाची बिनी कॅप दिसली नाही. याबाबत मित्रांना विचारणा केली.

या वेळी व्हेन डिसूजा हा तेथे नव्हता. चेनचा शोध घेतला. मात्र, ती सापडली नाही. सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले असता, व्हेन डिसूजा हा लिफ्टमधून बिनी कॅप घालून जाताना दिसून आला. यानंतर, त्यांनी पोलिसांत गुन्हा दाखल केला.

## 'इतना सन्नाटा क्यू है भाई'ला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य शासन आयोजित ६४व्या हौशी नाट्यस्पर्धेत महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था आणि रिफ्लेक्शन थिएटर, पनवेल यांनी सादर केलेल्या इतना सन्नाटा क्यू है भाई या नाटकाचा पहिला प्रयोग अत्यंत यशस्वी ठरला. प्रेक्षकांनी दिलेल्या भरभरून प्रतिसादामुळे प्रयोग शंभर टक्के हाऊसफुल झाला. तिकीटअभावी अनेक रसिकांना परत जावे लागल्याने संस्थेकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे.

पहिल्याच प्रयोगात मिळालेल्या प्रचंड दादेमुळे संपूर्ण टीममध्ये उत्साहाचे वातावरण असून, प्रेक्षकांच्या पाठिंब्यामुळे नाटक निश्चितच अंतिम फेरीत प्रवेश करेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

या यशाप्रसंगी रिफ्लेक्शन थिएटरच्या संस्थापक व व्यवस्थापक मृण्मय काणे, निर्माते दीपक मिराणी, लेखक व दिग्दर्शक संकेत गायकवाड, सोशल मीडिया प्रसिद्धी प्रमुख प्रसाद हनुमंते आणि संपूर्ण टीमने सर्व नाट्यप्रेमी प्रेक्षक तसेच हितचिंतकांचे तसेच मिडिया पार्टनर म्हणून दैनिक युवक आधार आणि विशेष सहकार्य म्हणून दैनिक रामप्रहरचेही मनःपूर्वक आभार मानले आहेत.

रिफ्लेक्शन थिएटरची टीम लवकरच पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला नवीन प्रयोगासह येणार असून, पनवेलमध्ये या नाटकाने निर्माण केलेला उत्साह नुकताच अनुभवलेल्या नाट्यमहोत्सवाची ओळख ठरतो आहे.

## एमएनएम विद्यालयात राणी लक्ष्मीबाई जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राथमिक विभागामार्फत शूर, कर्तबगार, निडर राज्यकार्य चालवणाऱ्या, इंग्रजांविरुद्ध नेटाने लढा देणाऱ्या झुंजार स्त्री व्यक्तिमत्व झाशीची राणी लक्ष्मीबाई जयंतीनिमित्त विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले होते.



शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी दीप प्रज्वलन केले व राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत त्यांना विनम्र अभिवादन केले. प्रार्थमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या कार्या बद्दल इंग्रजी व मराठी मधून छोटेखानी भाषणे केली. प्राथमिक विभागाच्या शिक्षिका नीता म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना राणी लक्ष्मीबाई यांची कार्य, नेतृत्व गुण, निडरपणा, लढाऊ वृत्ती, इंग्रजांविरुद्ध संयमाने दिलेल्या लढा, याबद्दल विद्यार्थ्यांना प्रेरणात्मक माहिती व संदेश दिला.

माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी, तसेच प्राथमिक विभागाचे सर्व शिक्षकांनी राणी लक्ष्मीबाई यांना विनम्र अभिवादन केले.

## सीकेटी विद्यालयात प्रोग्राम कार्ड डेकोरेशन स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रोग्राम कार्ड डेकोरेशन स्पर्धेचे संस्था स्तरावर आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन जे.बी.एस.पी. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.



कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संगीत शिक्षक रूपेश मढवी आणि तबला वादक संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली. या स्पर्धेत संस्थेतील सुमारे शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी शिक्षकांनी आपल्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार घडवून एकापेक्षा एक आकर्षक प्रोग्राम कार्ड सादर केले. परीक्षक म्हणून कला क्षेत्रातील जाणकार प्रविण जाधव आणि भारतभूषण पाटील यांनी काटेकोर परीक्षकाची भूमिका बजावत विजेत्यांची निवड केली.

स्पर्धेत सी.के.टी. विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या सक्‍हेल किशोर कडव यांनी प्रथम क्रमांक, खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, रूपाली म्हात्रे यांनी द्वितीय क्रमांक, तर चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातील महेश पोपेटा यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांचे वर्षा ठाकूर यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत सर्व सहभागी शिक्षकांचे विशेष कौतुक केले. या वेळी वर्षा प्रशांत ठाकूर, स्पर्धेचे परीक्षक प्रविण जाधव, भारतभूषण पाटील, मुख्याध्यापिका निलिमा



शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, स्पर्धाप्रमुख अनघा भोसले यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. ही संपूर्ण स्पर्धा मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयतकाने यशस्वीरीत्या पार पडली.

## 'शिव मावळे करंजाडे'कडून किल्ले रायगडवर स्वच्छता मोहीम

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या शिव मावळे करंजाडे यांच्या वतीने स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर्ती माझा किल्ला माझी जबाबदारी ही संकल्पना मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या मोहिमेमध्ये शिव मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्या कार्यक्रमात सुनील अंबावडे, राकेश कुसळे, अविनाश ठोसर, प्रशांत शेट्टी, अमर कुसळे,



शंतनू कदम, रोहन शिर्के, सुरेश बार्वे, सतिश चालगे, दिनेश टीमगिरे, समीर कांबळे, अमर सावंत, विवेक शिंदे,सिद्धांत अंबावडे, ओंकार, आनंद पुजारी, अथर्व, सत्यजित पाटील आदी मान्यवरांनी ह्या स्वच्छता मोहिमेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

ह्या वेळेस सत्यजित पाटील यांनी, असे सांगितले की, माझा किल्ला माझी जबाबदारी म्हणून प्रत्येकाने गड किल्ले स्वच्छ केले पाहिजेत.

गड किल्ल्यांची काळजी घेत गड किल्ल्याचे संवर्धन, संरक्षण केले पाहिजे. आणि हे गडकिल्ले जर स्वच्छ नसतील तर काय उपयोग म्हणून सर्व तरुणांनी एकत्र येऊन गडकिल्ले हे स्वच्छ केले पाहिजे. तरी प्रत्येकाने माझा किल्ला माझी जबाबदारी ही संकल्पना राबवावी, असे आवाहन त्यांनी केले.

## वाहतूक पोलिसांचा प्रामाणिकपणा ; दागिन्यांची पिशवी केली परत

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे दुचाकी वरून पडलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून ती त्यांना परत करण्यात आल्याने मलबारी कुटुंबीयांनी कळंबोली वाहतूक पोलिसांचे आभार मानले आहेत.

स्वप्नील श्याम मलबारी (रा.खारघर) हे आपल्या कुटुंबियांसह वाहनावरून कळंबोली सर्कल येथून जात



असताना सोन्याचे दागिने, मोबाईल फोन व रोख रक्कम असलेली बॅग ती त्या परिसरात खाली पडली परंतु ही बाब त्यांच्या लक्षत आली नाही आणि ते पुढे निघून गेले. दरम्यान तेथे कर्तव्यावर असणारे पोलीस हवालदार भोईर व पोलीस शिपाई राठोड यांच्या निदर्शनास ही बॅग आली.

सदर बॅग त्यांनी ताब्यात घेऊन मलबारी कुटूंबियांशी संपर्क साधून आतील गोष्टींची शहानिशा करून सदर बॅग मलबारी कुटुंबियांना परत केली. या वेळी मलबारी कुटुंबीयांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले व त्यांनी वाहतूक शाखेचे आभार मानले आहेत.

## संपादकीय

# संवेदनशीलतेची गरज

**शिक्षिकांच्या कथित छळामुळे दहावीतील मराठी विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना दिल्लीत घडली आहे. शाळेतील इतरही विद्यार्थ्यांची छळाची तक्रार असल्याने पालकांनी शाळेबाहेर तीव्र निदर्शने केल्यानंतर पोलिसांनी चार शिक्षिका व मुख्याध्यापकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. खरोखरीच सुयोग्य कारवाई झाली तरच अशा शाळा व शिक्षकांना विद्यार्थ्यांना संवेदनशीलतेने वागवण्याचा धडा मिळू शकेल.**

दिल्लीतील नामवंत शाळेत दहावीत शिकणाऱ्या शौर्य प्रदीप पाटील या सोळा वर्षांच्या मराठी मुलाने शिक्षिकांच्या कथित छळाला कंटाळून मंगळवारी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले. गेले काही महिने शिक्षिकांकडून त्याला सातत्याने वाईट वागणूक दिली जात होती याची कल्पना कुटुंबियांना होती. शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही आता याला दुजोरा दिला असून इतर विद्यार्थ्यांनाही शाळेत अशाच मानसिक छळाला तोंड द्यावे लागत असल्याचे सांगत अनेक पालकांनी सेंट कोलंबाज शाळेबाहेर गुरुवारी जोरदार निदर्शने केली. त्यानंतर शौर्यच्या स्युसाइड नोटमध्ये नावे असलेल्या शिक्षिकांसह मुख्याध्यापकांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याच महिन्यात १ तारखेला जयपूरमधील अशाच प्रतिष्ठित शाळेतील अवघ्या नऊ वर्षांच्या मुलीने वर्गातील विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या छळामुळे तसेच शिक्षिकेकडून मदत न मिळाल्याने शाळेतच आत्महत्या केली होती. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या ताणातून होणाऱ्या आत्महत्या हा आपल्याकडे केव्हाचाच एक मोठा प्रश्न बनला असून अलीकडच्या काळात शिक्षिकांकडून मानसिक छळाची वा टोकाच्या मारहाणीची प्रकरणेही अधुनमधून समोर येतात. वरील दोन्ही प्रकरणांत पालकांनी शाळेशी वारंवार संपर्क साधूनही शिक्षिकांनी व मुख्याध्यापकांनी दखल घेतली नाही. हा बेदरकारपणाच संबंधित मुलांना टोकाचे पाऊल उचलण्यापर्यंत घेऊन गेला. शिक्षणाला महत्त्व देऊन दोन्ही प्रकरणांत पालकांनी वर्ष वाया जाऊ नये म्हणून पुढील शैक्षणिक वर्षात शाळा बदलू असा दिलासा पाल्याला देण्याचा प्रयत्न केला होता. शाळेमध्ये शिक्षकांकडून पाल्याला अतिकठोर वागणूक मिळत असल्यास बहुदा पालक सामोपचाराचीच भूमिका घेतात. तक्रार केल्यास पाल्याला अधिकच आकसाने वागवले जाईल याची कल्पना पालकांना असते. त्यामुळेच त्रास सहन करण्याची व मुलाची समजूत काढण्याची भूमिका पालक घेतात. अशा परिस्थितीत पालकांना तक्रार नोंदवण्यासाठी एखादी तटस्थ यंत्रणा असण्याची गरज आहे. अशा टोकाच्या घटना टाळायच्या असल्यास विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापनानेही संवेदनशील राहण्याची गरज आहे. आत्महत्येपूर्वी शौर्य पाटीलने लिहिलेली दीड पानी स्युसाइड नोट अतिशय व्यथित करणारी आहे. शिक्षकांमुळेच आपल्याला टोकाचे पाऊल उचलावे लागत असून अन्य कुणाही विद्यार्थ्यावर ही वेळ येऊ नये अशी इच्छा त्याने व्यक्त केली आहे व त्याकरिता छळ करणाऱ्या शिक्षिकांवर कारवाई करण्याची अंतिम इच्छाही नमूद केली आहे. आत्महत्येबद्दल पालकांची पुन्हा पुन्हा माफी मागत, शक्य असल्यास आपले अवयव दान करावेत असे लिहिणारा हा मुलगा संवेदनशील मनाचा होता हे दिसते. घटना घडली त्यादिवशी शिक्षिकेने त्याला अनेक मुलांसमोर अपमानित केले होते. तुला शाळेतून काढून टाकू व ट्रान्स्फर सर्टिफिकेट इश्यू करू अशी धमकीही दिल्याने कमालीचा अस्वस्थ होऊन शौर्यने हे टोकाचे पाऊल उचलले असे त्याच्या सोबतच्या विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. पोलिसांनी चार शिक्षिका व मुख्याध्यापकांविरोधात आता गुन्हा नोंदवला आहे खरा, पण त्यांच्यावर खरोखरीच सुयोग्य कारवाई झाल्याचे समोर आले तरच कदाचित अशा शाळा व शिक्षक विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीबद्दल संवेदनशीलता बाळगतील.

# सांबरकुंड धरणाच्या कामाला चालना

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



अलिबाग तालुक्यातील सर्वात महत्वाचा प्रकल्प असलेल्या सांबरकुंड मध्यम सिंचन कामात वनजमिनींचा मोठा अडसर होता. अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांनी सांबरकुंड मध्यम सिंचन प्रकल्पासाठी २६३ हेक्टर वनजमिन वगळण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला होता. त्यास मंजूरी देण्यात आली आहे. यानंतर ६ नोव्हेंबर २०२५ रोजी वनजमिन हस्तारणाचे आदेश वनविभागाने जारी केले आहे. त्यामुळे गेली चार दशके रखडलेल्या या धरणाच्या मार्गातील मोठा अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे तब्बल चार दशकांच्या प्रतिक्षेनंतर धरणाच्या कामाला चालना मिळेल . हे धारण होणे ही काळाची गरज आहे.

अलिबाग तालुक्यातील शेतजमिन सिंचनाखाली यावी तसेच तालुक्यातील पाणी प्रश्न सुटावा यासाठी १९८२ साली या धरणाच्या कामाला मंजूरी देण्यात आली होती. मात्र निरनिराळ्या कारणांनी धरणाचे काम रखडले होते. यात वनजमिनींचा मोठा अडसर होता. तो आता दूर झाला आहे. धरणाच्या बांधकामासाठी जवळपास २ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पासाठी जांभूळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी येथील १०३ हेक्टर जागेचे भूसंपादन करण्यात आले आहे. धरणाची लांबी ७३० मीटर असून उंटी ३८.७८ मीटर असणार आहे. ज्यात ४९.८५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा केला जाणार आहे. प्रकल्पामुळे ४ हजार ३१४ हेक्टर जमिनी सिंचनाखाली येणार असून, २४ गावांना पाणी पुरवठा केला जाणार आहे.

१९६२ मध्ये अलिबागचे काँग्रेसचे तत्कालीन आमदार स्वर्गीय ना.का.भगत यांनी विधानसभेत सांबरकुंड धरणाची मागणी केली होती. या प्रकल्पाची पहिली प्रशासकीय मान्यता २८ जुलै १९८३ देण्यात आली. दुसरी सुधारीत मान्यता १६ मार्च १९९५ , तिसरी मान्यता ६ ऑक्टोबर २००१ , चौथी मान्यता २०१२ – २०१३ मध्ये व पाचवी सुधारित मान्यता ६ मे २०२० मध्ये देण्यात आली. अनेक वर्ष हे धरण रखडल आहे. स्व . ना. का. भगत यांनी प्रथम या धरणाबाबत पुढाकार घेतला. त्यानंतर स्व. मधुकर ठाकूर यांनी प्रयत्न केले.विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांनी सांबरकुंड धरण होण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

१९६२ पासून प्रस्तावित असलेले सांबर कुंड धरण २०२५ साल उजाडले तरी रखडले आहे. त्याला अनेक करणे आहेत. त्यातील एक कारण होते वनजमीन . ही वनजमिन हस्तारणाचे आदेश वनविभागाने जारी केले आहेत. त्यामुळे गेली चार दशके रखडलेल्या या धरणाच्या कामाला गती मिळेल . अलिबाग तालुक्याला एमआयडीसी आणि उमटे, तीनविरा या धरणातून नागरिकांना पाणी पुरवठा रोज होत असतो. साधारण पंचवीस ते तीस दलघमी पाणी तालुक्याला लागते. मात्र वेगाने होत असलेल्या शहरीकरणामुळे भविष्यात पाण्याची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे हे धारण होणे काळाची गरज आहे.

अलिबाग तालुक्यात उमटे धरणातून एक लाख नागरिकांना पाणी पुरवठा होत आहे. मात्र हे धरण चाळीस वर्ष झाले असून गाळाने भरले आहे. या धरणाची पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली आहे. तालुक्याला पाणी पुरवठ्याचा दुसरा स्त्रोत आहे एमआयडीसी पाण्याचा आहे. तालुक्यातील साठ ते सत्तर टक्के जनता ही एमआयडीसी पाण्यावर अवलंबून आहे. अलिबाग तालुक्यात पावसाळ्यात देखील काही गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. भविष्यात अलिबाग तालुक्यात मोठे प्रकल्प येणार आहेत. तेव्हा पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे अलिबाग तालुक्यात मोठ धरण होण आवश्यक आहे. सांबरकुंड धरणामुळे तालुक्यातील ३३ गावांमधील २ हजार ५२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या धरणामुळे अलिबाग तालुक्याचा चेहरामोहरा बदलेल. त्यामुळे हे धरण व्हायला हवे.

प्रस्तावित धरण परिसरातील जांभुळवाडी, सांबरकुंडवाडी आणि खैरवाडी या गावांतील शेतकर्यांना आपली घर सोडावी लागणार आहेत. शेतकरी विस्थापित होणार आहेत. पुनर्वसन रामराज येथे केले जाणार आहे. यासाठी १६ हेक्टर भुखंड उपलब्ध करून देण्यात आला असून त्यावर सुमारे तीनशे घरे बांधून दिली जाणार आहेत. या प्रकल्पासाठी संपादीत होणाऱ्या जागेच्या भूसंपादनासाठीचा २०१३ साली निवाडा प्रसिध्द झाला होता. मात्र वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी प्रकल्पबाधितांनी केली होती. सांबरकुंड प्रकल्प व्हायलाच हवा. ती काळाची गरज आहे. हे होत असताना ज्यांच्या जमिनी जाणर आहेत, जे विस्थपित होणार आहेत त्याना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. त्यांचे योग्य पुनर्वसन केले पाहिजे .

अलिबाग तालुक्यातील दुसार एक प्रकल्प म्हणजे सारळघोळ. स्व. मधुकर ठाकूर आमदार असताना त्यांनी सारळ – घोळ प्रकल्पाबाबत प्रयत्न केले होते. परंतु नंतर मात्र हा प्रकल्प रखडला. सारळ – घोळ प्रकल्पाची नुसती चर्चाच होते. प्रत्यक्षात काही होत नाही. हा प्रकल्प झाला तर अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागाची पाण्याची समस्या सुटणार आहे. या भागातील काही गावांना पावसळ्यात देखील टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. मांडवा – रेवस परिसारातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. भविष्यात रेवस – करंजा पूल होणार आहे. त्यामुळे धनदांडग्यांनी या भागात जमीन खरेदी करून ठेवल्या आहेत.


## लेखक, नाटककार शं. ना. नवरे

शंकर नारायण नवरे उर्फ शन्ना हे मराठी लेखक, नाटककार व पटकथाकार होते. त्यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९२७ रोजी ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथे झाला. प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गीय माणसाच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर आणि भावविश्वावर त्यांनी लेखन केले. 'आनंदाचं झाड' हे त्यांच्या एका पुस्तकाचे नाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे असेच होते. अस्सल डोंबिवलीकर असलेल्या शन्नांनी ठाणे, मुंबई आणि तिथल्या मध्यमवर्गीय आणि पांढरपेशा माणसांच्या दैनंदिन समस्या जवळून पाहिल्या, अनुभवल्या होत्या आणि त्याचे यतार्थ चित्रण त्यांच्या लेखनातून झालेले दिसून येते.'एक असतो राजा', 'मन पाखरू पाखरू', 'धुक्यात हरवली वाट', 'नवरा म्हणू नये आपला', 'सूर राहू दे', 'गुंतता हृदय हे', 'हवा अंधारा कवडसा', 'गहिरे रंग', 'गुलाम', 'वर्षाव', 'रंगसावल्या', 'हसत हसत फसवुनी', 'मला भेट हवी हो', ही त्यांची नाटके प्रसिद्ध आहेत. 'घरकुल', 'बाजीरावचा बेटा', 'बिरबल माय ब्रदर' (इंग्रजी), 'कैवारी', 'हेच माझं माहेर', 'असंभव' (हिंदी), 'कळत नकळत', 'जन्मदाता', 'निवडुंग', 'सवत माझी लाडकी', 'तू तिथं मी', 'झंझावात' यांसारख्या चित्रपटांच्या कथा त्यांच्या होत्या. पु. भा. भावे पुरस्कार, नाट्यभूषण पुरस्कार, असे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळाले. अशा या प्रतिभावान लेखकाचे २५ सप्टेंबर २०१३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# खासगी फाईल्ससाठी विंडोजचे 'हे' फिचर वापरा

सिक्रेट फोल्डर विंडोज हे सर्वाधिक वापरले जाणारे ऑपरेटिंग सिस्टिम आहे. यामध्ये अनेक फीचर्स आहेत



जे तुम्हालाही माहिती नसतील. तुम्हाला काही फाईल्स गुप्त ठेवायच्या असल्यास तुम्ही एका खास ट्रिकद्वारे त्या गुप्त ठेवू शकता. विशेष म्हणजे ज्या फोल्डरमध्ये तुम्ही या फाईल्स ठेवाल त्या फोल्डरचे नाव आणि त्याचे आयकन हे कोणालाही दिसणार नाही. तो होमपेजवर किंवा फोल्डरमध्ये असेल. जेव्हा तुम्ही त्यावर माऊस न्याल तेव्हाच तो तुम्हाला तिथे असल्याचे लक्षात येईल. हे फोल्डर कसे तयार करायचे? जाणून घेऊया.

**अदृश्य फोल्डर तयार करण्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा**

नाव नसलेले फोल्डर तयार करण्यासाठी डेस्कटॉपवर कुठेही राइट क्लिक करा आणि न्यूवर क्लिक करून फोल्डरवर क्लिक करा. फोल्डर तयार झाल्यावर त्यावर पुन्हा राइट क्लिक करा आणि कंटेक्स्टच्युअल ऑपश्नमध्ये रिनेम निवडा.

पुढच्या स्टेप्ससाठी तुमच्याकडे पूर्ण आकाराचा किबोर्ड (उजवीकडे नमपॅड असेलेला किबोर्ड) आवश्यक असेल. अल्ट + ०१६० (ब्रेक स्पेस पडू नये यासाठी अल्ट कोड शॉर्टकट) टाइप करा आणि एन्टर दाबा. आता तुम्हाला नाव नसलेले फोल्डर दिसेल.


**आयकन हटवण्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा**

फोल्डरचे आयकन हटवण्यासाठी पुन्हा फोल्डरवर राइट क्लिक करा आणि प्रॉपर्टीमध्ये जा. येथे तुम्ही कस्टमाइज टॅबवर नेविगेट करू शकता आणि नंतर चेंज आयकन हा सर्वात तळाशी असलेला पर्याय निवडा. डिफॉल्ट पर्यायापैकी उजवीकडे स्क्रोल करा, तुम्हाला चार ब्लँक आयकन दिसून येतील, यापैकी कोणतेही निवडा.

आता तुमच्याकडे नाव आणि आयकन नसलेले फोल्डर असेल. जेव्हा तुम्ही फोल्डरवर क्लिक कराल किंवा त्यास सिलेक्शन विंडोमध्ये समाविष्ट कराल किंवा त्यावर माऊस न्याल तेव्हा ते तुम्हाला दिसून येईल. तुम्ही असा फोल्डर वापरत असल्यास त्यास डेस्कटॉपच्या कॉर्नरवर ठेवा.

अशा प्रकारे अनेक सुविधा कम्प्युटर, विंडोमध्ये उपलब्ध असतात, ज्यांच्याबद्दल वापरकर्त्यांना माहिती नसते. त्यांचा वापर चांगल्या पद्धतीने करता येतो.

# मराठी विनोदी लेखक चिंतामण जोशी



**निमित्त**

प्रसिध्द मराठी विनोदी लेखक चिंतामण विनायक जोशी यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी... त्यांचा जन्म १९ जानेवारी १८९२ रोजी पुणे येथे झाला. 'सुधारक' या पत्राचे संपादक वि. रा. जोशी हे त्यांचे वडील होते. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात झाले. फर्ग्युसन कॉलेजातून बी.ए. (१९१३), एम.ए. (१९१६) झाले. त्यांनी चाळीसपेक्षा अधिक पुस्तके लिहून त्यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली ती विशेष महत्त्वाची होय. पाली भाषेचा त्यांचा विशेष अभ्यास होता. बडोदे महाविद्यालयात ते पाली विषयाचे प्राध्यापक होते.

त्यांचे वडील विनायक रामचंद्र जोशी हे शिक्षक होते. त्यांनी आगरकर यांच्या सुधारक या वृत्तपत्राचे काही काळ संपादनही केले होते. सार्वजनिक काका म्हणून ओळखले जाणारे गणेश वासुदेव जोशी हे देखील जोश्यांच्याच घराण्यातले होते. चिं. वि. जोशी यांचे बहुतांशी लेखन हे विनोदी वाङ्मय असले तरी ते व्यावहारिक जीवनात ते धीरगंभीर प्रवृत्तीचे गृहस्थ होते. त्यांच्या मुलाचा अकाली मृत्यू झाला होता, त्यामुळे ते दुःखी असत.

दूरचित्रवाणीवरची 'चिमणराव–गुंड्याभाऊ' ही मालिका खूप गाजली. मालिकेत चिमणरावांचे काम दिलीप प्रभावळकरांनी, गुंड्याभाऊचे बाळ कर्वे यांनी, चिमणरावांच्या पत्नीचे (कावेरीचे–काऊचे) स्मिता पावसकर यांनी, मैना या कन्येचे काम अरुणा पुरोहित यांनी तर मोरू व राघू या पुत्रांचे काम अनुक्रमे नीरज माईणकर व गणेश मतकरी यांनी केले होते. सुषमा तेंडुलकर, लक्ष्मीकांत बेर्डे, सुलभा कोरान्ने या व इतर बऱ्याच कलाकारांनी देखील या मालिकेत काम केले होते. या मालिकेच्या निर्मात्या विजया जोगळेकर–धुमाळे होत्या.

चिं.वि. जोशी यांच्या कथेवर सन १९४२ मध्ये 'सरकारी पाहुणे' नावाचा चित्रपट निघाला होता. त्याचे दिग्दर्शन मास्टर विनायक यांनी केले होते. चिमणरावांची भूमिका दामुअण्णा मालवणकर यांनी केली होती. चिं.वि.जोशींच्या, संध्या बोडस–काणे व अलका जोशी–मांडके या नातींनी संकलित केलेले 'चि.वि. जोशी – साहित्यातले आणि आठवणीतले' हे पुस्तक कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने छापून प्रसिद्ध केले आहे. अक्षरधारा प्रकाशनाने 'विनोदाचे बादशहा चिं. वि जोशींचे निवडक विनोद' नावाचे एक अतिशय छोटे पुस्तक प्रकाशित केले आहे. विनोदांचे संकलन रवींद्र कोल्हे यांनी केले आहे.

विनोदी लेखनाची प्रेरणा त्यांना कोल्हटकर–गडक–यांच्या कोटित्वयुक्त लेखनातून मिळाली व त्याचा ठसा आपणास त्यांच्या प्रारंभीच्या 'एरंडाचे गु–हाळ (१९३२)'मधील लेखन व 'चिमणरावांचे च–हाट (१९३३)', मधील विवाहविषयक लेख यांवर स्पष्ट दिसतो. या मराठी लेखकांबरोबरच मार्क ट्वेन, डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब्स, जेरोम के जेरोम, यांच्या विनोदी लेखनाचे संस्कार त्यांच्यावर झाले.

पूर्वीच्या विनोदकरांप्रमाणे त्यांनीही चिमणराव व गुंड्याभाऊ अशी मानसपुत्रांची जोडगोळी जन्मास घातली आणि तिला विविध लोकव्यवहारांतून फिरवून आणले, त्यामुळे त'चिमराव स्टेट गेस्ट' या त्यांच्या एका कथेवरुन काढण्यात आलेला 'सरकारी पाहुण' हा चित्रपट महाराष्ट्रात विलक्षण गाजला होता. जोशी यांचे मुंबईत २१ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन झाले. (साभार – इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दररोज किती प्रमाणात गूळ खावा? जाणून घ्या..

गूळ हा ऊस आणि ताडाच्या झाडाच्या रसापासून तयार करण्यात येणारा गोड पदार्थ आहे. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गुळाला विशेष महत्त्व आहे. हा पदार्थ मुख्यत: चिक्की किंवा लाडू तयार करण्यासाठी वापरला जातो. जरी गुळाच्या सेवनाने अनेक पौष्टिक फायदे मिळतात तरीही त्याचा प्राथमिक घटक साखर आहे आणि त्यामुळे गुळाच्या सेवनाविषयी विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे. विशेषत: मधुमेह असणाऱ्या लोकांनी साखरेच्या सेवनावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.



दिल्ली येथील न्युट्रिशनिस्ट कनिका नारंग यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती जाणून घेतली. गूळ हा प्रक्रिया करून तयार करण्यात येतो आणि गुळामध्ये पौष्टिक घटक आढळतात. गुळामध्ये सुक्रोज असते. तसेच लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम व कॅल्शियम यांसारखी खनिजे असतात. गुळामध्ये भरपूर अँटिऑक्सिडंट्ससुद्धा असतात. गुळाचा ग्लायसेमिक इंडेक्स ५५ असतो; तर रिफाइंड साखरेचा ६५ असतो. एक चमचा (२० ग्रॅम) गुळामध्ये अंदाजे ६५–७५ कॅलरी असतात आणि १५–१६ ग्रॅम साखर असते. त्याचबरोबर त्यात ११ टक्के लोह व चार टक्के मॅग्नेशियम असते.

बदाम, काजू व शेंगदाण्यांसारख्या सुक्या मेव्यामुळे चांगले फॅट्स, प्रोटिन्स व फायबर मिळते. त्यामुळे साखरेचे शोषण कमी करण्यास मदत होते आणि रक्तातील साखर नियंत्रित राहते. वेलची, दालचिनी व बडीशेप यांसारखे पदार्थ फक्त जिभेची चवच वाढवत ना,त तर ते रक्तातील साखरही नियंत्रित करतात. उदा. चिक्की किंवा गूळ–शेंगदाणे प्रोटीन्स आणि चांगले फॅट्स शरीराला पुरवतात, जे गुळातील कार्बोहायड्रेट संतुलित करण्यास मदत करतात. तिळाचे लाडू करताना त्यात गुळाचा समावेश करा. तिळामध्ये कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम असतात. चहामध्ये गूळ, आले व दालचिनी टाका. या पदार्थांमधीलअँटिऑक्सिडंट्समुळे पचनाशी संबंधित फायदे वाढतात.

डब्ल्यूएचओच्या शिफारशीनुसार साखर दररोजच्या कॅलरीज सेवनामध्ये पाच टक्क्यांपेक्षा जास्त नसावी. २००० कॅलरीयुक्त आहारासाठी दररोज गूळ आणि इतर गोड पदार्थांचा समावेश करून २५–५० ग्रॅम साखरेचे सेवन करावे. ज्या लोकांना मधुमेह नाही, त्यांनी दैनंदिन जीवनात अंदाजे एक चमचा साखर घ्यावी. उदा. गूळ आणि सुक्या मेव्याचा एक तुकडा सकाळी, दुपारच्या जेवणानंतर घ्यावा. त्यामध्ये प्रोटीन्स आणि फायबरचा समावेश केला, तर मधुमेह असलेल्या लोकांना ५–१० ग्रॅम साखरेचे सेवन करता येते.

# तळा येथे भूमी अभिलेख कार्यालय व्हेंटिलेटरवर

## ८ रिक्त पदांमुळे शेतकरी वर्गातून नाराजी

**तळा : प्रतिनिधी**

तळा भूमी अभिलेख कार्यालयात एकूण १४ पद मंजूर असून ८ पदे रिक्त आहेत.त्यात महत्वाचे असणारे कार्यालय प्रमुखाचे पद रिक्त असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.जमेची बाजू म्हणजे आठवड्यातील मंगळवार या दिवशी सुधागड पाली यांचेकडे तळा भूमी अभिलेख कार्यालय प्रमुखांना चार्ज दिला असल्याने तळा येथे येतात. परंतु हे पद त्वरीत भरण्यात यावे अशी अपेक्षा सामान्य जनतेतून केली जात आहे.त्यातच प्रती नियुक्ती वरती महाड येथील कर्मचारी ओ एस पदावरती काम करत आहे.



भूमी अभिलेख कार्यालयाच्या इमारतीचाही प्रश्न असून सध्या नगरपंचायतीच्या शेजारी ज्या ठिकाणी सुरवातीचे पंचायत समिती कार्यालय होते त्याठिकाणी भूमी अभिलेख कार्यालय असून नवीन भूमी अभिलेख कार्यालयाची इमारत होणे आवश्यक आहे.भूमीअभिलेख हे शेती, जमीन जागा याबाबतचे तालुक्यातील मुख्य कार्यालय असून त्या कार्यालयालाच स्वतः चे कार्यालय नाही.हा एक प्रश्न आहे.सदर भूमी अभिलेख नवीन कार्यालय होण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्या कार्यालयाला योग्य ठिकाणी पुरेपुर जागा उपलब्ध करून सुसज्ज असे कार्यालय व्हावे अशी मागणी नागरिक व शेतकऱ्यांतून होत आहे.

सदर चालू असलेल्या कार्यालयात अनेक समस्या असून माहिती तंत्रज्ञानाच्या काळात कार्यालयातून प्रिंट मिळणे आवश्यक असते परंतु कर्मचाऱ्यांना बाहेर जावून प्रिंट आणावी लागते.तसेच लॅपटॉपचीही गरज असल्याचे पहावयास मिळाले असून कर्मचारी स्वतःचे लॅपटॉप आणून काम करत असल्याचे दिसले त्यामुळे अशा या तालुक्याच्या भूमी अभिलेख कार्यालयाला ज्या ज्या साहित्याची गरज आहे ती शासनाने पुरविणे आवश्यक आहे.

# कर्जत इंग्लिश मीडियम स्कूल रक्तदान शिबिरात ३७ जणांचे रक्तदान



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत एज्यूकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कुलच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त माया रक्त केंद्र बदलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३७ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत, खालापुर तालुक्यात आयोजित केलेले हे ५२८ वे रक्तदान शिबिर ठरले.

इंग्लिश न मिडीयम शाळेच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उदघाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी कार्याध्यक्ष डॉ.अनिरुद्ध जोशी, सचिव प्रविण गांगल, श्रीकांत मनोरे, सतिश पिंपरे, मदन परमार, बिपीन पालकर, अनुपमा चौधरी, वृषाली वैद्य आदी उपस्थित होते. रक्त संकलनाचे काम बदलापूर येथील माया रक्त केंद्राचे डॉक्टर, आरोग्यसेवक यांनी केले. याप्रसंगी सचिन मनोरे, डॉ. प्रशांत सदावर्ते, अमिर मणियार, संजीव ठाकरे, विनोद पांडे, कैलास पोटे, सुनिल भोपतराव, अनिल शहा व शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## उरण नगरपरिषद, उरण

ता. उरण, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०० ७०२
दूरध्वनी क्रमांक: ०२२- २७२२२३२०
Email ID : municipalcounciluran@gmail.com

जा.क्र.: उनप/बांवि/२१२१/२०२५-२०२६ दिनांक :- १९/११/२०२५

**जाहीर सुचना**

तमाम लोकांना या नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, राज्यातील नगरपालिकांच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विकास हक्क हस्तांतरण संदर्भात नवीन विनियम अंतर्भुत करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१कक) (ग) अन्वये प्रसिध्द अधिसुचना क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.१२२/१२/न.प./नवि-१३, दिनांक ०६/०२/२०१६ अन्वये शासनाने अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे.

त्याअनुषंगाने उरण शहर विकास आराखडयातील टाऊन हॉल, मल्टीप्लेक्स व वाणिज्य संकूल या प्रयोजनाकरिता आरक्षित भूखंडापैकी मौजे बोरीपाखाडी सर्व्हे नं. १५८/९/ब/१ क्षेत्र ६०० चौ.मी. जागा मालक श्री. भालचंद्र गोपाळ उपाध्ये यांनी विकास हक्क हस्तांतरण (TDR) च्या मोबदल्यात उरण नगरपरिषदेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करणेचा प्रस्ताव दिनांक १८/०९/२०२४ रोजी दिलेला आहे.

तरी उपरोक्त हस्तांतरणास कोणाची हरकत, आक्षेप, हितसंबध किंवा इतर हक्क असल्यास संबंधितांनी हि सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांचेकडे आपल्या हरकती दाखल करणेच्या आहेत.

वरिल मुदतीत कोणत्याही हरकती, आक्षेप, प्राप्त न झाल्यास यासंबंधी कोणतीही हरकत नाही असे समजून पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : उरण**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
उरण नगरपरिषद, उरण

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२-२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email Id : panvelcorporation@gmail.com

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मे. मंगलमुर्ती कंस्ट्रक्शन्स तर्फे भागीदार श्री. त्रिशूल म्हात्रे., १०४, वृंदावन हाईट्स, बापट वाडा, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ जांभूळ व ०१ फणस अशी एकूण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील साईरत्न को-ऑप. हौ. सोसा. लि., फायनल प्लॉट नं.-२०५/८६ आणि प्लॉट नं.- ११८, एम. सी. सी. एच. सोसायटी पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे प्लॉटच्या आवारातील ०१ जांभूळ व ०१ फणस अशी एकूण ०२ झाडे हे इमारत बांधणीत अडथळा व वाहने आत बाहेर (ये -जा) करणेस बाधित होत असुन, धोकादायक स्थितीत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ६१९/६४०/२०२५**
**दिनांक :- २०/११/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# नाणोरे राजिप शाळेत येथे स्नेह-ऋणानुबंध सोहळा



**माणगाव : प्रतिनिधी**

शाळेत मागील नऊ वर्षापासून कार्यरत असलेल्या शिक्षिका वनिता डोळस यांची बागवाडी या शाळेमध्ये ऑनलाईन पद्धतीने बदली झाली व त्यांचे जागेवर डोंगरोली वरची वाडी येथे कार्यरत असलेले शिक्षक अमित पानसरे हे हजर झाले आहेत. त्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती व पालक वर्ग शाळा नाणोरे यांनी स्नेह- ऋणानुबंध सोहळ्याचे आयोजन केले होते.

यावेळी उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे , गावचे पोलीस पाटील भारत पाटोळे, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अन्वी मासुक व मुख्याध्यापिका सायली वाटवे यांनी शिक्षिका वनिता डोळस यांच्या कार्याविषयीचे गौरव उद्गार आपल्या भाषणातून व्यक्त केले. तसेच सर्व सदस्य व पालक वर्गानी शिक्षिका वनिता डोळस यांचे औक्षण करून शाळेतर्फे त्यांचा सत्कार केला व भेट वस्तू दिली. शिक्षिका वनिता डोळस यांनी यावेळी शाळेसाठी वॉटर फिल्टर भेट दिला तसेच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य व खाऊ यांचे वाटप केले.शाळेत नवीन आलेले शिक्षक अमित पानसरे यांचेही यावेळी व्यवस्थापन समिती व पालक वर्गातर्फे शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

सदर सोहळ्याप्रसंगी केंद्रप्रमुख शंकर शिंदे ,गावचे पोलीस पाटील भारत पाटोळे ,व्यवस्थापन समिती अध्यक्षा अन्वी मासुक, सदस्य रीना सावंत , निकिता लाड,ज्योत्स्ना शिगवण, सुष्मिता लाड, मेघा मोरे, रेखा पाटोळे, रितू गुजराती , पुनम पाटोळे इत्यादी सदस्य उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित पानसरे आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका सायली वाटवे यांनी केले.

# रविवारी नेरळमध्ये 'आगरी शाला'

**कर्जत :** कर्जत तालुका आगरी समाज संघटना आणि आगरी साहित्य चळवळ यांच्या विद्यमाने आगरी बोली भाषा यांच्यावर आधारित आगरी शाला कार्यशाळा आयोजित केली आहे. रविवारी २३ नोव्हेंबर रोजी ही कार्यशाळा आगरी समाज हॉल नेरळ येथे होणार आहे. या कार्यशाळेत आगरी शाला पुस्तकाचे प्रकाशन आणि आगरी ग्रंथालय उद्घाटन केले जाणार आहे. या सोहळ्यात आगरी कला गौरव पुरस्कार मनोहर कोळंबे आणि आगरी भाषेत पीएचडी करणारे डॉ.अविनाश पाटील यांना आगरी साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

**पा हि जे त**

**पनवेल मधील मालवणी हॉटेलसाठी १२ वी पास मुले सुपरवायझर/कॅशिअर व वेटर पाहिजे, पगारा सोबत राहण्याची-जेवणाची सोय.**

**संपर्क : ८१०४४५३१६४/९८६०७७८१५३/८२९१७३४९३३**

# उसर हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयात इयत्ता दहावी बॅच २००३-०४ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न झाला. मुंबई, घाटकोपर, वसई, नालासोपारा, चेंबूर, डोंबिवली आदी ठिकाणांहून मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी विद्यार्थी व समाजसेवक किशोर शिंदे तर अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे हे होते. २१ वर्षांपूर्वी शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या जुन्या शालेय आठवणींना उजाळा देण्याचा सुखद अनुभव मिळाला. जुन्या बेंचवर बसण्याचा आनंद, त्यावेळचे इंग्रजी शिक्षक श्री. सुर्वे सर यांच्या हातून प्रतीकात्मक 'छडी' घेण्याची मजा यांनी वातावरणात आनंद निर्माण केला. डिजिटल सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय आणि संगणक कक्ष पाहून माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. मैदानावर खेळलेला खो-खोचा खेळ विशेष आकर्षण ठरला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट भोजनाची व्यवस्था केली होती.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून संस्थेचे आणि जुन्या शिक्षकांचे कौतुक केले. त्या काळातील शिक्षकांचा शाल, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. शाळेतून घडलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थी मिलिंद तांबडे (भानंग कोन्ड), उद्योजक - मुंबई, यांनी शाळेच्या वॉल कंपाऊंडसाठी आर्थिक मदत जाहीर केली. दहावीच्या बॅचनेही या उपक्रमासाठी निधी दिला. अध्यक्षीय भाषणात सुर्वे यांनी सेवानिवृत्ती जवळ आली असली तरी संस्थेच्या मार्गदर्शनाने व समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने वॉल कंपाऊंडचे काम पूर्ण करण्याचा विश्वास व्यक्त केला.



मा राठोड मॅडम कोर्ट

अ‍ॅड जी आर कडव
अ‍ॅड. प्रणाली सोहनी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात.

दिवाणी चौकशी अर्ज नं. १३८४/२०२५
ने.ता. २४/१२/२०२५
निशाणी नं. ८/ड

१. श्रीमती कविता महेश कोळी
वय - ३२ वर्षे, धंदा - गृहिणी
२. कु. प्रणाली महेश कोळी
वय ११ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क.आई
अर्जदार नं. १ -दोघीही रा. बिल्डींग नं. ३,
रुम नं. ६०२, सुरक्षा बिल्डिंग, आर.सी.मार्ग,
संत वीरशैव कैकय महाराज मार्ग, शास्त्रीनगर जवळ,
वाशीनाका, चेंबूर, मुंबई. } अर्जदार

विरुद्ध

श्रीमती जोमूबाई तुकाराम कोळी
वय - ६६ वर्षे, धंदा गृहिणी रा. बिल्डींग
नं. ३, रुम नं. ६०२, सुरक्षा बिल्डिंग,
आर.सी.मार्ग, संत वीरशैव कैकय महाराज मार्ग,
शास्त्रीनगर जवळ, वाशीनाका, चेंबूर, मुंबई. } सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ चे पती, अर्जदार नं. २ चे वडिल व सामनेवाला हयांचा मुलगा कै. महेश तुकाराम कोळी वय - ३८ रा बिल्डींग नं. ३. रुम नं. ६०२, सुरक्षा बिल्डिंग, आर.सी मार्ग, संत वीरशैव कैकय महाराज मार्ग, शास्त्रीनगर जवळ, वाशीनाका, चेंबूर, मुंबई हे ता. २५/७/२०२५ रोजी सायन मुनिसिपल हॉस्पीटल अ‍ॅण्ड मेडिकल कॉलेज, ग्रेटर मुंबई येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार १, २ व सामनेवाला असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

कै. महेश तुकाराम कोळी यांचे हिश्यास असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**परिशिष्ठ अ**

| गांव | यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| कोपर | ३९ | ६७ | ३ | १-३५-६ |

**' परिशिष्ठ ब**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक नोड (वहाळ) | ४०५ | २५ ए | ४६० चौ.मी. |

वरीलप्रमाणे जमिन मिळकती असून परिशिष्ठ ब मधील मिळकतीपूर्वी सिडकोतर्फे मौजे उलवे येथे सेक्टर क्र. २५ ए. भूखंड क्र. ३७१, क्षेत्र ४६० चौ. मी. भूखंडाचे वाटपपत्र देण्यात आले होते.

परंतु त्यानंतर वरील प्रमाणे परिशिष्ठ ब नुसार भूखंड देवून त्याचे शुद्धीपत्र मयतास देण्यात आलेले आहे. कै. महेश तुकाराम कोळी यांचे निधन झालेमुळे सिडकोने अर्जदारांस त्यांचा वारसदाखला मागितला आहे. सबब सदरचा दिवाणी चौकशी अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणा-या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. आज ता.. १९/११/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**पनवेल**

## महाराष्ट्र शासन

**महाड मार्ग प्रकल्प विभाग, महाड (रायगड)**

Email:-rpddivision@gmail.com Ph.No. (02145) 222243

## निविदा सूचना क्रमांक ०८ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, महाड (मा.प्र.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२ ३०१, दुरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटवार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आर्यकारी अभियंता, महाड (मा.प्र.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | किल्ले रायगडावरील गंगासागर तलावाचे जतन व संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | ३,३६,८०,१०३/- | १,७०,०००,०० | २,३६०/- | २४ महिने | खुला |
| २. | किल्ले रायगडावर हत्ती तलाव ते बाजारपेठेच्या मागील भागापर्यंत सर्वात वर असलेल्या तटबंदीचे संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | २,७७,८५,०१९/- | १,५०,०००,०० | २,३६०/- | २४ महिने | खुला |
| ३. | किल्ले रायगडावर हत्ती तलाव ते गंगासागर तलावापर्यंत सर्वात वर असलेल्या तटबंदीचे संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | २,६३,१२,५६९/- | १,५०,०००,०० | २,३६०/- | २४ महिने | खुला |
| ४. | किल्ले रायगावरील गंगासागर ते हिरकणी बुरुज बाजूच्या सर्वात वर असलेल्या तटबंदीचे संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | २,५४,४६,८२७/- | १,५०,०००,०० | २,३६०/- | २४ महिने | खुला |
| ५. | किल्ले रायगडावरील वाघ दरवाजाकडे जाणाऱ्या मार्गावर सुरक्षात्मक उपाययोजना करणे, ता. महाड, जि. रायगड. | २,४७,०५,४५०/- | १,५०,०००,०० | २,३६०/- | २४ महिने | खुला |
| ६. | किल्ले रायगडावरील बारा (१२) टाकी जवळ असलेल्या दारु कोठार व संरचनात्मक अवशेषांचे संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | २,३६,६६,१९०/- | १,५०,०००,०० | २,३६०/- | २४ महिने | खुला |
| ७. | बाराटाकी जवळील दारु गोळा कोठाराचे जतन व संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | १,९१,९०,८६४/- | १,५०,०००,०० | ११८०/- | २४ महिने | खुला |
| ८. | हत्ती तलावाचे संवर्धन करणे व तलावाच्या भिंतीची दुरुस्ती करणे, ता. महाड, जि. रायगड. | १,८६,७०,३४६/- | १,५०,०००,०० | ११८०/- | २४ महिने | खुला |
| ९. | किल्ले रायगडावरील महादरवाजा ते टकमकटोक कडो जाणाऱ्या तटबंदीचे जतन व संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड | १,४४,३१,७८५/- | १,४५,०००,०० | ११८०/- | २४ महिने | खुला |

### ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२१/११/२०२५** (सकाळी १०.०० पासुन) ते दिनांक **२८/११/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २. | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, कोकण यांचे कार्यालयात दिनांक **२५/११/२०२५ वेळ १५.०० वाजता. (अ.क्र. ०१ व ०४ करीता)** अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२५/११/२०२५ वेळ ११.०० वाजता. (अ.क्र ०५ ते ०९ करीता)** |
| ३. | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०१/१२/२०२५ वेळ ११.००** वाजता. |

**टिप :-** परिपुर्ण निविदा या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ ८१२**
**दिनांक : १८/११/२०२५**

**आरओसी २०२५-२६/क्र-५/सी ४१३२**

**सही/**
**(श्री. सलोनी स. निकम)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (मा.प्र) विभाग, महाड**

# महापे येथे बेकायदेशीर कॉल सेंटरवर धाड

## १७ जणांना अटक; सात कोटींची फसवणूक उघडकीस

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील महापे येथे बेकायदेशीर कॉल सेंटर वर सायबर पोलिसांनी धाड टाकून त्याला सील ठोकले आहे. या प्रकरणी १७ जणांना अटक करण्यात आले आहे तर सातपेक्षा अधिक लोकांचा शोध सुरु आहे. तसेच चार जणांना नोटीस बजावण्यात आली आहे. सट्टा बाजारात गुंतवणूकी वर कमी कालावधीत मोठा परतावा मिळेल असे आमिष दाखवून सामान्य जणांची फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून अनेक गोष्टींचा उलगडा होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

गगन अजितकुमार थापर, रोशन सुदेश घायवट, सत्यम रामशंकर यादव, महेश अभिमन्यु पाटील, संकेत चंद्रकांत सरतापे हर्षद सणस वय, विनायक चव्हाण, सुमित फडके, अक्षय शिर्के, अमित शिर्के, पंकज शेंडे, सुमेध कोरडे अतुल ठाकुर, मयुर गायकवाड गणेश डंगापुरे, गणेश पाटोळे, नरेश अहिरवार, असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. तसेच श्रध्दा



गजरे, प्राजक्ता गोळे, संतोष धोत्रे, यांना नोटीस बजावण्यात आले आहे. या शिवाय शिव शर्मा, सचिन लोभे, अजहर जमादार सोनी, हरिष पवार, शॉन, लिजा उर्फ स्नेहल यांचा शोध सुरू आहे. सर्व आरोपी हे २१ ते ४९ वयोगटातील असून त्यात तरुणांचा भरणा अधिक आहे. आपण काय करतो याची जाणीव संशयित आरोपींना असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. तसेच कॉल सेंटर नेमके कोण चालवते, मालक कोण याबाबत सखोल तपास सुरू आहे.

गेल्या काही महिन्यांपासून सट्टा बाजारात आमच्या सल्ल्याने गुंतवणूक करा कमी कालावधीत दुप्पट चौपट परतावा मिळेल अशा आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करण्याच्या गुन्ह्यात वाढ होत होती. हा प्रकार नक्की कुठून चालतो याचा शोध सायबर पोलीस घेत होते. त्यातच त्यांना एक माहिती मिळाली. त्यानुसार नवी मुंबई लगत असणाऱ्या ठाणे बेलापूर या औद्योगिक पट्ट्यात असणाऱ्या महापे येथील मिलेनियम बिझनेस पार्क येथील इमारत क्रमांक तीन तिसऱ्या माळ्यावर एक कॉल सेंटर सुरू आहे. या कॉल सेंटरला कुठलीही परवानगी नसून बेकायदेशीर रित्या चालते.

या माहितीशी शहानिशा गुप्त पद्धतीने करण्यात आल्यावर या कॉल सेंटरला कुठलीही परवानगी नाही. तसेच येथून सट्टा बाजारात भरघोस परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक केली जाते असेलही काही तांत्रिक पुरावे जोडण्यात आले. आणि योजनाबद्ध रित्या मंगळवारी रात्री या कॉल सेंटर वर धाड टाकण्यात आली. त्यावेळी उपस्थित सर्वांनवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्या वर बेकायदेशीर रित्या कॉल सेंटर चालवणे, नागरिकांची फसवणूक करणे, नागरिकांची माहिती अनधिकृत रित्या प्राप्त करणे आणि आर्थिक फसवणूक करणे या प्रकरणी माहिति तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांना मिळालेल्या प्राथमिक माहिती नुसार हे कॉल सेंटर १ जानेवारी २०२५ पासून सुरू आहे. तसेच संगणक व अन्य तांत्रिक तपास जो आता पर्यंत करण्यात आला त्यानुसार सामान्य नागरिकांची सात कोटी एक लाख ११ हजार ४०१ रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र हा तपास अद्याप पूर्ण झाला नसून त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# नेरूळ रेल्वे स्थानकासमोरील मार्गावर सतत अपघात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ (पश्चिम) रेल्वे स्थानकासमोर नेरूळ गाव प्रवेशद्वार जवळ असलेला मार्ग अपघाती मार्ग बनू लागला आहे. इथं वाहनांचे अपघात सर्रास होऊ लागले आहेत. त्यामुळे येथे रंबलर्स, स्पीड ब्रेकर बसवावे, अशी मागणी होत आहे.

नेरूळ स्थानकाच्या पश्चिमेला असलेला हा मार्ग सतत गजबजलेला असतो. याच मार्गाला लागून नेरुळ गावात रस्ता जातो तर मुख्य मार्गाला लागून रेल्वे स्थानकात एक मार्ग जात असल्याने येथे वाहनांची सतत वर्दळ असते. हा चौक वाहनाच्या ये-जा असल्याने सतत गजबजलेला असतो, मात्र इथं एकही पोलीस चौकी अथवा पोलीस बिट नाही परिणामी चारचाकी आणि दुचाकी वाहन चालकाचे पुरते फावले असून दोन्ही मार्गांवर वाहन बिंदिक्कत पार्क केलेली असल्याचे पहावयास मिळते. सध्या हाच मार्ग आता अपघाताला निमंत्रण देणारा ठरू लागला आहे.



या स्टेशन मार्गावर नेरुळ गावातून वाहने येत असतात. स्थानकाजवळ असलेल्या समांतर मार्गावरून रिक्षा व मोटरसायकलची ये-जा मुख्य रस्त्यावर होते. या सर्व रस्त्यांचा संगम हा अपघाताला कारणीभूत ठरत आहे. त्यात अनेकदा रिक्षाचालक वेगात बेशिस्तपणे येत असल्याने मुख्य रस्त्यावर समांतर मार्गावरून सेक्टर १० येथून स्थानकाकडे जाणाऱ्या भरधाव वाहनांना करकचून ब्रेक मारावे लागतात. त्यामुळे अनेकदा समोरासमोर अपघात घडून त्याचे पर्यावसन हाणामारीत होते.

इथं कोणतीही जीवित हानी झालेली नसली, तरी दुखापत होण्याचे आणि वाहनांची एकमेकांशी टक्कर होण्याचे प्रकार अनेकदा घडले आहेत. यातून वाहन चालक तसेच नागरिकांमध्ये बाचाबाची, भांडले असे प्रकार वारंवार होत असतात.

या मार्गव्यतिरिक्त अन्य मार्ग नसल्यामुळे वाहनांना नाईलाजाने येथून जावे लागते. तसेच याच बाजूला नेरुळ गाव लागूनच असल्याने येथुन कित्येक वेळेस गाड्यांची नेहमी ये -जा असते. त्यामुळे सेक्टर १० येथून स्थानकाकडे जाताना मुख्य मार्ग ओलांडून नेरूळ गावात जावे लागते. मध्येच वाहने थांबून नेरूळ गावात वळण घ्यावे लागत असल्याने त्यामुळे प्रसंग घडतात.

# नवी मुंबईत मेट्रोचे जाळे; वाशी, नेरूळ, सीवूड, बेलापूरमध्ये स्थानके

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ थेट नवी मुंबई विमानतळाला मेट्रोने जोडण्यासाठी राज्य सरकारने सिडकोमार्फत आखलेल्या 'मेट्रो ८' प्रकल्पामुळे आता नवी मुंबई महापालिका हद्दीतील वेगवेगळ्या उपनगरांमध्येही प्रथमच मेट्रो मार्गिकेचे जाळे विणले जाणार आहे. या नियोजित मेट्रो प्रकल्पातील दहा स्थानके ही मानखुर्दपासून ठाणे खाडीपलीकडे नवी मुंबई क्षेत्रात उभारली जाणार आहेत. यासंबंधीच्या प्रकल्पास राज्य सरकारने मंजुरी दिल्यानंतर आता शहरांतर्गत या मार्गाच्या आखणीचे नेमके स्वरूप स्पष्ट होऊ लागले आहे. वाशी खाडी पूल ओलांडून शीव-पनवेल महामार्गाच्या दिशेने मार्गक्रमण करणारी ही मेट्रो मार्गिका नेरूळ, सीवूड या दोन उपनगरांच्या अंतर्गत भागातून विमानतळाच्या दिशेने नेण्यात येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) ३३७ किमी लांबीच्या मेट्रो प्रकल्पात 'मेट्रो ८' मार्गिका समाविष्ट करण्याचा निर्णय नुकताच राज्य सरकारने घेतला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि आणि 'सिडको' या मार्गिकेची संयुक्तपणे उभारणी करणार होते, मात्र राज्य सरकारने सिडको आणि खासगी कंपनीच्या माध्यमातून खासगी-



सार्वजनिक सहभागातून या मार्गिकेची उभारणी करण्याचा निर्णय घेतला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या विमानतळावरून पहिल्या विमानाचे उड्डाण येत्या २५ डिसेंबर रोजी होणार आहे. विमानतळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम वेगाने पूर्ण केल्यानंतर राज्य सरकारने मुंबई ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गिकेच्या उभारणीचे कामही आता 'सिडको'कडे सोपविले आहे.

मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ दरम्यान 'मेट्रो ८' मार्गिकेची एकूण अंदाजे ३५ किमी असून या मार्गिकेच्या उभारणीसाठी अंदाजे १५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. ही मार्गिका मुंबई आणि नवी मुंबई अशा दोन महानगरांतून जाणार असली तरी नवी मुंबई विमानतळाला ती वेगवेगळ्या मेट्रो मार्गिकांनी जोडली जाईल, अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

### नवी मुंबईत दहा स्थानके

'मेट्रो ८' प्रकल्पातील एकूण २० स्थानकांपैकी १० स्थानके ही नवी मुंबई परिसरात असणार आहेत. यामध्ये वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरुळ सेक्टर एक, नेरुळ, सीवूड, बेलापूर ही सात स्थानके नवी मुंबई महापालिका हद्दीत असणार आहेत. मानखुर्द येथून ठाणे खाडी पूल ओलांडून येणारी मेट्रो वाशी, सानपाडा, जुईनगर येथे शीव-पनवेल महामार्गावरुन मार्गक्रमण करणार आहे.

# नमुंमपाचा मतदार यादी कार्यक्रम जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी गुरुवारी (दि.२०) प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दि. १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या १५० ऐरोली, १५१ बेलापूर व १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीवरून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आलेली आहे. ही यादी दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी महानगरपालिका मुख्यालय तसेच संबंधित प्रभागाच्या विभाग कार्यालयातील नोटीस बोर्डवर तसेच महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

या प्रारूप मतदार यादीवर २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार असून प्राप्त हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या ५ डिसेंबर २०२५ रोजी अधिप्रमाणित करून प्रसिध्द करावयाच्या आहेत. त्याचप्रमाणे दि. ०८ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. तसेच दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द होणार आहे. सदर मतदार यादीची प्रत प्रतिपृष्ठ २ रुपये इतका दर आकारून उपलब्ध करून देण्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. या करिता १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन मतदार यादी तयार करण्यात येते.

ही प्रारुप मतदार यादी राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार प्रसिध्द करण्यात आली आहे. या प्रारुप मतदार यादीत नव्याने कोणतेही नाव समाविष्ट होणार नसून प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीत - (१) लेखनिकांच्या काही चुका असल्यास, (२) दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असल्यास, (३) संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही महानगरपालिकेच्या संबधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे समाविष्ट करणे, (४) मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती किंवा सूचना प्राप्त झाल्यास त्यांची नोंद मार्क कॉपी मध्ये घेणे - केवळ अशा प्रकारची सुधारणा / दुरुस्ती करता येईल.विहित मुदतीत प्राप्त होणा-या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीमध्ये करण्यासाठी व अंतिम मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून विभाग प्रमुख व त्यांना सहाय्यक म्हणून इतर अधिकारी, कर्मचारी यांची विभाग कार्यालयनिहाय नियुक्ती करण्यात आली आहे.दिघा विभाग कार्यालयात प्रभाग क्र.१,२,३ व ऐरोली विभाग कार्यालयात प्रभाग क्र. ४,५,७ आणि घणसोली विभाग कार्यालयात प्रभाग क्र. ६,८,९ तसेच कोपरखैरणे विभाग कार्यालयात प्रभाग क्र. १०,११,१२,१३ या प्रभाग क्रमांकांशी संबंधित प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना विहित नमुन्यात दाखल करता येतील.

अशाचप्रकारे तुर्भे विभाग कार्यालयात प्रभाग क्र. १४,१५,१९ व वाशी विभाग कार्यालयात प्रभाग क्र. १६,१७,१८ आणि नेरूळ विभाग कार्यालयात प्रभाग क्र. २०,२१,२२,२३,२४,२५ तसेच बेलापूर विभाग कार्यालयात प्रभाग क्र. २६,२७,२८ या प्रभाग क्रमांकांशी संबंधित प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना विहित नमुन्यात दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जाहीर करण्यात आलेल्या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादीच्या कार्यक्रमाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# उलवे नोडमध्ये सुसज्ज आणि आधुनिक सुविधा भाजीपाला दुकान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील सेक्टर २४ मध्ये फ्रेशली ग्रीन या सुसज्ज आणि आधुनिक सुविधांनी युक्त भाजीपाला व फळांच्या दुकानाचे उद्घाटन उलवे नोड भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा निकिता खारकर यांच्या हस्ते उत्साहात झाले.



या उद्घाटनावेळी गव्हाण जिल्हा परिषद भाजपा अध्यक्ष निलेश खारकर, उलवे नोड भाजपा अध्यक्ष वितेश म्हात्रे, पनवेल पश्चिम मंडल भाजपाचे उपाध्यक्ष सुहास गोंधळी, उलवे नोड उपाध्यक्ष शैलेश भगत, भाजपाचे युवा नेते प्रतिश पाटील, वैश्ववी ग्रामपंचायत सरपंच अजित पाटील, उरण भाजपा संपर्कप्रमुख करण ठाकूर, जासई महिला मोर्चा अध्यक्षा तसेच कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

फ्रेशली ग्रीन दुकानामुळे स्थानिक नागरिकांना ताज्या भाज्या, फळे आणि गुणवत्तापूर्ण कृषी उत्पादने एका ठिकाणी उपलब्ध होणार असून, या दुकानामुळे परिसरातील खरेदी सुविधांमध्ये वाढ होण्यास मदत मिळेल.

# रॅश ड्रायव्हिंगप्रकरणी बाईकर्सवर कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी सेक्टर १७ ते बेलापूर असा पामबीच रोडवर बायकर्सने त्यांच्या परदेशी बनावटीच्या दुचाकी या वेगाने हाकण्याच्या स्पर्धा करत असल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या स्पर्धात्मक रॅश ड्रायव्हिंग करणाऱ्या बाईकर्सना पोलिसांनी धडा शिकवला आहे.

प्रणव पद्माकर जाधव (रा. वाकोला ब्रिज, नेहरूनगर, मुंबई), सूर्यदेव सिंह सर्जेराव देसाई (रा. टिळक नगर, चेंबूर), अभिषेक देवदास साबळे (रा. जय मल्हार संस्था अपार्टमेंट, शेडुंग गाव) अशी तिघांची नावे आहेत.

१९ नोव्हेंबर रोजी नेरूळ पोलीस ठाण्याचे वपोनी ब्रह्मानंद नाईकवाडी यांना पामबीच रस्त्यावर तीन ते चार बाईकर स्पर्धात्मक मोटरसायकल भन्नाट वेगाने दिसून आले. त्यांनी स्वतः बाईकरच्या पाठीमागून पाठलाग करून पामबीच रोडवर सारसोळे सिग्नल ते वज्राणी सिग्नल नेरूळ येथे रात्री दीडच्या सुमारास त्यांना आणि त्यांची बाईक रोखून ताब्यात घेतली. या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

अनुगामी लोकराज्य महाभियानच्या अनुलोमच्या वतीने भारतीय संविधानाच्या पंचाहत्तरी निमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच अनुषंगाने नवी मुंबईतील विविध शाळांमध्ये सुद्धा भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी तसेच भारतीय संविधानाची माहिती प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावी या दृष्टीने एस.व्ही.सामंत विद्यालय तुर्भे येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानास प्रा. निळकंठ बिजलगावकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्राध्यापक कोळी, अनुलोमचे विभाग प्रमुख रामनाथ म्हात्रे, सुरेश सिंग राणा हे सुद्धा उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विविध उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१९) स्टँडर्ड क्लबतर्फे स्टँडर्ड्सवरील ओरिएंटेशन सत्र व स्टँडर्ड्स प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी बी.आय.ए.स मुंबई येथील मान्यवर पाहुणे सी. एल. श्रीवास्तव आणि डॉ. डी. के. दास यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सोहम म्हात्रे (एफ वाय सी एस), द्वितीय क्रमांक अविवन मेमन (एफ वाय बी एस सी) तृतीय क्रमांक फुर्कान खांबकर (एस वाय सी एस) उत्तेजनार्थ पारितोषिक अभिनव खताळ( एफ वाय आय टी) स्टँडर्ड्स क्लबच्या समन्वयक, प्रा. रिजवाना मोमीन यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

कार्यक्रमाला परवानगी दिल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम तसेच यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रोत्साहनाबद्दल मनःपूर्वक आभार मानले तसेच स्टँडर्ड्स क्लबमधील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सदस्य आणि स्वयंसेवक यांचेही समर्पित योगदानाबद्दल आभार मानले.

# जागतिक शौचालय दिनानिमित्त स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

१९ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगभरात संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केल्याप्रमाणे जागतिक शौचालय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या दिवसाचे औचित्य साधून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील सर्व ४०५ सार्वजनिक व सामुदायिक शौचालयामध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे शौचालयाची दैनंदिन स्वच्छता करणा-या ५६० सफाईमित्रांचा कॅप आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.




अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली आयोजित या स्वच्छता आणि सन्मान उपक्रमात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे हे आकांक्षी शौचालय, कोपरखैरणे येथे स्वच्छता मोहीमेत स्वत: सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, उपमुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर व विजय पडघन तसेच सर्व विभाग कार्यालयातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व उप स्वच्छता निरीक्षक आणि अभियंता वैभव देशमुख यांनीही शौचालय स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला. शौचालयाचा वापर करा असा संदेश लिहिलेला पांढऱ्या रंगाचा मॅस्कॉट लक्ष वेधून घेत होता.

शौचालयाच्या वापरातून सार्वजनिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा व वैयक्तिक सुरक्षा ही उद्दिष्ट साध्य होत असल्याने स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण यांच्या एकत्रित विचारातून शौचालय वापराला प्राधान्य देण्यात येत आहे. याबाबत जागरुकता वाढविण्यासाठी जागतिक शौचालय दिन साजरा करण्यात येत असतो. नवी मुंबई महानगरपालिकेने या निमित्त शौचालय स्वच्छतेची विशेष मोहीम राबवित तेथील स्वच्छतेसाठी दैनंदिन काम करणाऱ्या सफाई मित्रांच्या कामाचा आदर राखत कृतज्ञ सन्मान केला आहे.

### दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत
# टीम इंडियाला मिळणार नवा कर्णधार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाला गेल्या काही महिन्यात दुखापतीचं ग्रहण लागलं आहे. त्यामुळे अनेक दिग्गज खेळाडूंना आत बाहेर राहावं लागत आहे. असं असताना टीम इंडियाला दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी मोठा धक्का बसला. कर्णधार शुबमन गिल दुखापतग्रस्त असल्याने दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळणार की नाही याबाबत होता, पण आता तो दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळणार नाही हे याबाबत संभ्रम आहे.

शुबमन गिलबाबतचे अपडेट २१ नोव्हेंबरला दिले जाणार आहेत. त्यामुळे ऋषभ पंतकडे संघाची धुरा सोपवली जाण्याची शक्यता आहे. आता ऋषभ पंतला दक्षिण अफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या वनडे मालिकेसाठी सज्ज राहण्यास सांगितलं आहे. कारण शुबमन गिल पूर्णपणे दुखापतीतून सावरलेला नाही. त्यामुळे त्याचं वनडे मालिकेत खेळणं कठीण आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी शुबमन गिलकडे कर्णधारपद सोपवलं होतं. मात्र दुसऱ्याच मालिकेत दुखापतग्रस्त झाल्याने नव्या कर्णधाराची गरज भासली आहे.



रेव्हस्पोर्ट्सच्या रिपोर्टनुसार, शुबमन गिल अजूनही फिट नाही. जर त्याला गुवाहाटी कसोटीत खेळवण्याचा निर्णय घेतला गेला असता आणि त्यात काही झालं असतं तर स्थिती अजून खराब झाली असती. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते मानेच्या दुखापतीतून सावरण्यासाठी पाच ते सात दिवसांचा अवधी लागतो. त्यामुळे शुबमन गिल खेळणार की नाही हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. पण खेळला नाही तर दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेलाही मुकण्याची शक्यता आहे. कारण सलग सामने खेळत असल्याने दुखापतग्रस्त होत असल्याचं क्रीडातज्ज्ञांचं म्हणणं आहे.

वनडे मालिकेची धुरा आपसूक ऋषभ पंतकडे येण्याची शक्यता आहे. कारण ऑस्ट्रेलिया वनडे मालिकेत उपकर्णधार श्रेयस अय्यरला दुखापत झाली होती. त्यामुळे दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेला मुकणार आहे. त्यामुळे ऋषभ पंतच संघाची धुरा सांभाळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, केएल राहुलदेखील वनडे कर्णधारपदाच्या शर्यतीत आहे.

**साई सुदर्शनला मिळणार कसोटीची संधी**

भारतीय संघाच्या व्यावसायिक डॉक्टरांनी प्रयत्न केले, पण दुखापतीमुळे शुभमन पहिल्या कसोटीतील दुसऱ्या डावातही मैदानात उतरू शकला नाही. त्यामुळे दुसऱ्या कसोटीत त्याच्या जागी कोणाला संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष होते. सूत्रांच्या माहितीनुसार शुभमन गिलच्या जागी इंग्लंड दौऱ्यावर खेळलेला डावखुरा फलंदाज साई सुदर्शनला स्थान मिळण्याची शक्यता आहे.

# पहिल्या कसोटीसाठी इंग्लंडचा संघ जाहीर



**पर्थ : वृत्तसंस्था**

कसोटी क्रिकेटमधील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठेची मालिका असलेल्या ॲशेस २०२५-२६चा थरार येत्या शुक्रवार (दि. २१) पासून पर्थ येथे सुरू होणार आहे. या बहुप्रतिक्षित मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंडने आपला १२ सदस्यीय संघ जाहीर केला आहे.

दुखापतीमुळे अनिश्चितता असलेल्या घातक वेगवान गोलंदाज मार्क वुड याचे संघात पुनरागमन झाले आहे, ज्यामुळे इंग्लंडच्या 'पेस बॅटरी'ची ताकद वाढली आहे.

पर्थची खेळपट्टी नेहमीच वेगवान गोलंदाजांसाठी अनुकूल मानली जाते आणि इंग्लंडने याच गोष्टीवर लक्ष केंद्रित केले आहे. मार्क वुडच्या आगमनामुळे इंग्लंडकडे गस अटकिंसन, ब्रायडन कार्स आणि जोफ्रा आर्चर यांसारख्या वेगवान गोलंदाजांची फौज आहे. यामुळे प्रतिस्पर्धी ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांसमोर मोठे आव्हान उभे ठाकणार आहे.

इंग्लंडच्या संघात शोएब बशीर या एकमेव स्पेशालिस्ट फिरकीपटूला स्थान मिळाले आहे, मात्र पर्थच्या परिस्थितीचा विचार केल्यास अंतिम ११मध्ये त्याचे स्थान निश्चित नाही. कर्णधार बेन स्टोक्सला जर फिरकीची गरज भासली, तर कर्णधार जो रूट आणि हॅरी ब्रूक हे पार्ट-टाईम फिरकीपटू ही भूमिका सहज पार पाडू शकतात. त्यामुळे, अंतिम प्लेइंग इलेव्हनमध्ये एका अतिरिक्त वेगवान गोलंदाजाला संधी मिळण्याची शक्यता अधिक आहे.

स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या ऑस्ट्रेलिया संघात युवा गोलंदाज ब्रेंडन डोग्गेट याला पदार्पणाची संधी मिळते का याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या रोणाल पाटीलने पटकाविले रौप्यपदक

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंजाब येथे नुकत्याच पार पडलेल्या १६व्या नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून प्रतिनिधीत्व करत उज्ज्वल कामगिरी करून रजत पदक जिंकण्याचा मान पनवेल तालुक्यामधील केवाळे गावातील रोणाल महेश पाटील याने मिळवला असून त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार त्याचा करण्यात आला.

रोणाल हा युनाइटेड शोटोकान कराटे असोसिएशन इंडिया (निलेश फाईटर) या अकॅडेमीमध्ये प्रशिक्षक योगेश बैकर यांच्याकडून बॉक्सिंगचे धडे घेत आहे. अमृतसर येथे झालेल्या या स्पर्धेत देशभरातील अनेक राज्यांमधून उत्कृष्ट खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. ३० किलो वजनावरील गटात झालेल्या या स्पर्धेत तीव्र स्पर्धा आणि कडव्या सामन्यांमध्ये रोणालने दाखवलेली जिद्द, कौशल्य आणि अचूक तंत्र यामुळे त्याने रौप्यपदकाची कमाई करत पनवेल तालुक्याचा मान उंचावला. या कामगिरीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोणाल कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



# अंडर-१९ विश्वचषकात भारत-पाक सामना नाही!

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया कपमधील भारत-पाकिस्तान सामन्यांमध्ये झालेल्या हायव्होल्टेज वादामुळे आयसीसीने एक मोठा निर्णय घेतला आहे. २०२६मध्ये होणाऱ्या अंडर-१९ विश्वचषकामध्ये भारत-पाकिस्तान भिडणार नाहीत, अशीच खबरदारी घेण्यात आली आहे. यासाठी वेळापत्रकातच मोठा बदल करण्यात आला आहे.

क्रिकेट चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण करणाऱ्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय-व्होल्टेज सामन्यांना ग्रुप स्टेजमध्ये स्थान न देण्याचा निर्णय आयसीसीने घेतला आहे. क्रिकेट खेळाचे भविष्य सुरक्षित ठेवणे आणि स्पर्धेतील केवळ याच एका सामन्यावर होणारे अतिरिक्त लक्ष केंद्रीकरण थांबविण्याचा आयसीसीचा प्रयत्न आहे.

आयसीसी अशी रचना करणार आहे की दोन्ही संघ आपोआप वेगवेगळ्या ग्रुपमध्ये जाणार आहेत. यामुळे क्रिकेट चाहत्यांना आता भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा रोमांचक सामना पाहण्यासाठी स्पर्धेतील पुढील महत्त्वाच्या टप्प्यांपर्यंत म्हणजेच सुपर सिक्स, सेमी-फायनल किंवा फायनलपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

# बॉल दोनदा बॅटला लागून फलंदाज बाद

**सुरत : वृत्तसंस्था**

क्रिकेटमध्ये अनेक वेळा अशा घटना घडतात, ज्या पाहून स्वतः खेळाडूही चकित होतात. अशीच एक घटना रणजी ट्रॉफीच्या प्लेट लीगमधील मणिपूर विरुद्ध मेघालय सामन्यात पहायला मिळाली. या सामन्यात मणिपूरचा फलंदाज लामाबम सिंह 'हिट द बॉल ट्वाइस' या दुर्मिळ नियमामुळे बाद झाला आणि मैदानावर उपस्थित असलेल्या सर्वांना काही क्षण काय घडले हेच कळेना.

मेघालयचा गोलंदाज आर्यन बोरा याने टाकलेला एक साधा दिसणारा बॉल लामाबमने डिफेन्ड केला. बॉल बॅटला लागून खाली पडला, पण हळूहळू स्टंप्सकडे रोल होऊ लागला. विकेट उडण्याची भीती वाटल्याने लामाबमने तत्काळ प्रतिक्रिया देत दुसऱ्यांदा बॅट लावून चेंडूला थांबवले. हीच त्याची मोठी चूक ठरली.

तिथेच उभ्या असलेल्या अंपायर धर्मेश भारद्वाज यांनी लगेच हात वर केला आणि त्याला Hit the ball twice - OUT ठरवलं. मेघालयने अपील केले आणि खेळाडू वाद न घालता शांतपणे मैदान सोडून गेला.



मैदानावरील अधिकाऱ्यांनी 'क्रिकइन्फो'ला सांगितले की बॉल पॅडने थांबवण्यास परवानगी होती, पण लामाबमने बॅट वापरली, आणि ते नियमात बसत नाही. नियमांनुसार दिलेला बाद निर्णय अगदी योग्य होता. त्यामुळे खेळाडूंनी कोणताही वाद न घालता तो मान्य केला.

# जर्मनी, नेदरलँडस्‌ची फीफा फुटबॉल विश्वचषकात धडक

**बर्लिन, मस्टरडॅम : वृत्तसंस्था**

अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या फिफा फुटबॉल विश्वचषकासाठी जर्मनी व नेदरलँडस्‌ने अगदी थाटात आपले स्थान निश्चित केले. युरोपीय पात्रता फेरीच्या शेवटच्या सामन्यांमध्ये दोन्ही संघांनी गोलचा वर्षाव करत या जागतिक स्पर्धेचे आपण प्रबळ दावेदार असल्याचे अधोरेखित केले.

जर्मनीचे मुख्य प्रशिक्षक ज्युलियन यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या जर्मनीने लिपझिग येथे स्लोव्हाकियाचा ६-० असा धुव्वा उडवला, तर रोनाल्ड कोमन यांच्या नेदरलँडस्‌ने मस्टरडॅममध्ये लिथुआनियाला ४-०ने पराभूत केले. विश्वचषक पात्रतेसाठी दोन्ही संघांना केवळ बरोबरीची आवश्यकता होती, मात्र त्यांनी बचावात्मक पवित्र्याऐवजी आक्रमक खेळावर भर दिला.




जर्मनीचा धडाका सामन्यापूर्वी गुणांच्या बाबतीत स्लोव्हाकियाशी बरोबरीत असलेल्या चार वेळच्या विश्वविजेत्या जर्मनीने सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मिळवली. १८व्या मिनिटाला निक वोल्टेमेडने हेडरद्वारे पहिला गोल केला. त्यानंतर गनॅब्रीने आघाडी दुप्पट केली. लिरॉय सानेने मध्यंतरापूर्वी दोन गोल केले, तर रिडल बाकू आणि असान ओएड्राओगो यांनी उत्तरार्धात गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

'अ' गटातील अन्य एका सामन्यात नॉर्दर्न आयर्लंडने लक्झमबर्गचा १-० असा पराभव केला, तरीही त्यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले, मात्र नेशन्स लीगमधील त्यांच्या क्रमवारीमुळे त्यांना मार्चमध्ये होणाऱ्या १६ संघांच्या युरोपीय प्ले-ऑफ फेरीत स्थान मिळाले आहे.

'एल' गटात आधीच अव्वलस्थान निश्चित केलेल्या क्रोएशियाने पिछाडीवरून मुसंडी मारत मॉन्टेनेग्रोचा ३-२ असा पराभव केला, तर चेक प्रजासत्ताकने जिब्राल्टरला ६-०ने चिरडले. पोलंडने एका अटीतटीच्या सामन्यात माल्टावर ३-२ असा विजय मिळवला आणि 'जी' गटात नेदरलँडस्च्या पाठोपाठ दुसरे स्थान पटकावले.




# महेंद्रसिंग धोनी, ऋतुराजची 'या' खेळाडुला पसंती



**नाशिक : प्रतिनिधी**

आगामी आयपीएल २०२६च्या हंगामासाठी महेंद्रसिंग धोनी आणि ऋतुराज गायकवाड यांच्या बलाढ्य चेन्नई सुपर किंग्सने नाशिकच्या अष्टपैलु खेळाडुची निवड केली आहे.

नाशिकच्या क्रिकेट क्षेत्रातील साहिल पारख, समकीत सुराणा हे दोन नवोदित खेळाडू सध्या गाजत आहेत. हे दोघे खेळाडू लवकरच आयपीएलमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे, परंतु नाशिकच्या अष्टपैलू रामकृष्ण घोषची मागील हंगामाप्रमाणेच यंदाही आगामी आयपीएल २०२६च्या हंगामासाठी बलाढ्य चेन्नई सुपर किंग्स संघाने (सीएसके) निवड केली आहे. मागील वर्षी सीएसके संघाने आयपी एल लिलावात रामकृष्ण घोषला आपल्या ताफ्यात समाविष्ट करून घेतले होते. त्याला आगामी हंगामासाठी चेन्नई सुपर किंग्सने संघात कायम ठेवले आहे (रिटेन). इतर खेळाडूंसाठी १६ डिसेंबर रोजी आयपीएल लिलाव होईल.

रामकृष्ण घोष सध्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या रणजी चषक स्पर्धेत अंकित बावणेच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. त्याने चंदीगडविरुद्धच्या सामन्यात सहा गडी बाद करून प्रभावी कामगिरी केली. २०२२ साली पदार्पण करत त्याने महाराष्ट्र संघातर्फे सय्यद मुश्ताक अली टी-ट्वेंटी स्पर्धेत दोन सामने खेळले होते. सुरुवातीपासून नाशिकमध्ये क्रिकेटचे धडे गिरवलेल्या रामकृष्णने विविध वयोगटात नाशिकचे प्रतिनिधित्व केले आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com